

# श्री साईलीला

जून     कि. ५० पैसे     १९६८



# श्री सा ई वा क्सु धा

गुरुजींच्या आज्ञेचें उलंघन म्हणजे अधःपतन होय. गुरुजींची आज्ञा शिरसावंद्य मानणें हेंच धर्माचरण होय. आपले प्राण जावोत कीं राहोत. कोणताही विकट प्रसंग वाट्यास येवो, गुरुजींची आज्ञा प्रमाण मानून तिचें प्रतिपालन करणें हेंच आमचें कर्तव्य. त्याचे परिणाम काय होतील ते होवोत. त्याचा विचार आपण कां करा ? त्याची चिंता गुरुजींना. आम्हीं अर्थ अनर्थ कांहीं जाणत नाहीं. तसेंच स्वार्थ व परार्थही जाणत नाहीं. गुरुजींनीं सांगितलेलें कार्य पार पाडण्यासाठीं झटायचें, हेंच आमचें कर्तव्य व तोच आमचा परमार्थ.

—श्रीसाईसच्चरित


श्री साईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४७ वें ] जुलै १९६८ [ अंक ४ था

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ४४३३६१

: कार्यालय :

साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,
प्लॉट नं. ८०४ बी, दादर मुंबई १४.

# बाबांचे परमभक्त श्री दासगणू महाराज

प्रिय वाचक—

सन्तकवि श्रीदासगणू महाराज यांचा परिचय आमच्या वाचकांस वेळोवेळीं करून देण्यांत आलेला आहे. श्रीसाईबाबांना आपलें सर्वस्व मानून व ज्यांनीं मानवतावादी शिकवण अमलांत आणून तिचा परिचय आपल्या कीर्तनाच्या नि काव्यलेखनाच्या रूपानें अखिल महाराष्ट्रभरच नव्हे तर भारताच्या इतर प्रांतांतील लोकांतही केला, अशा थोर भक्तांत त्यांची गणना प्रामुख्यानें करावी लागेल.

संपादकीय स्तंभांतून त्यांचा परिचय करून देण्याचें प्रमुख कारण म्हणजे चालू १९६८ साल हें श्रीदासगणूमहाराजांचें जन्मशताब्दि संवत्सर आहे व त्यानिमित्त आमचे एक स्नेही श्री. मधुकर जोशी यानीं नुकतेंच प्रसिद्ध केलेलें त्यांचें सुबोध नि परिणामकारक पद्धतीनें लिहिलेलें त्यांचें संक्षिप्त चरित्र होय.

महाराजांचे सच्छिष्य व त्यांचें कार्य यथाशक्ति पुढें चालविणारे श्री. अनंतराव आठवले यानीं त्यांचें विस्तृत व वाङ्मय परिचयात्मक पुस्तक किंवा ज्याला ग्रंथराज म्हणणेंच अधिक शोभेल, असें पुस्तक कांहीं वर्षापूर्वी प्रसिद्ध करून वाचकांस व त्यांच्या चहात्यांस त्यांचा परिचय करून दिलेला आहे. एवढ्यावरच न थांबतां महाराजांचे काव्य वाङ्मयही त्यानीं एकंदर दहा खंडांत प्रसिद्ध केलें. त्यांच्या हातून पार पडलेली ही फार मोठी तशीच उपयुक्त अशी कामगिरी होय. श्रीदासगणूचें काव्य वाङ्मय तसें थोडेंथोडकें नाहीं. तो एक महासागरच आहे. त्यांच्या काव्यांची संख्या एक लाखाहून अधिक होईल.

असें असतांही सन्तकवि श्रीदासगणू महराज यांची व त्यांच्या काव्यांची माहिती आजकाल किती जणांस असेल बरें ? श्रीदासगणू हे एक परिणामकारक कीर्तनकार होते, व महीपती कवीप्रमाणें त्यानीं अनेक कवींचीं ओंवीबद्ध चरित्रें लिहिलीं आहेत, या पलीकडे त्यांच्यासंबंधीं माहिती सर्वसाधारण जनतेला राहो, परंतु सुशिक्षित वर्गातील लोकांनाही नाहीं. तें दैन्य दूर व्हावें व त्यांच्या जीवनकार्याची कल्पना सर्वांना करून घेतां यावी, या सद्धेतूनें श्री. मधुकर जोशी यानीं हा एक

यशस्वी प्रयत्न केला आहे. विशेष म्हणजे त्यांना संतांची नि संतवाङ्मयाची भारी आवड आहे. त्यांचा पिंडच बालपणापासून धर्मभावनेनें नि श्रद्धेनें भारलेला आहे.

अनेक माणसें साठी उलटून गेली म्हणजे देवाधर्माकडे व भक्तिभावाकडे वळतात. त्याना वळावेंच लागतें म्हणा ना; परंतु मधुकर जोशी यांचें तसें नाहीं. त्यांना अगदीं ऐन तारुण्यांतच देवाधर्मांची नि संतांची व त्यांच्या वाङ्मयाची गोडी लागली. ऐन तारुण्यांतील या गोडीचें माहात्म्य फार मोठें असतें. ती गोडी त्या व्यक्तीच्या कल्याणाला जशी कारणीभूत होत असते, तशीच ती इतरे-जनांनाही फलदायक होऊं शकते.

* त्यांनीं लिहून पूर्ण केलेलें प्रस्तुत पुस्तक–'सन्तकवि श्रीदासगणू महाराज–दर्शन' हें त्याच त्यांच्या भक्तिभावाचें एक सुरम्य फळ आहे. या सन्तकवींचा थोडा-फार सहवास त्यांना लाभला होता; परंतु त्यांच्या जोडीला त्यांचे सच्छिष्य श्री. अनंतराव आठवले यांच्याही निकट सहवासांत त्यांना येतां आलें; त्यामुळें या ग्रंथरचनेला त्यांना सुंदर शोभा आणतां-आलेली आहे.

या ग्रंथांत श्री. जोशी यानीं सुमारें ७५ पानांत महाराजांचें चरित्र ओघवती भाषेंत कथन केलें असून, काव्यदर्शनासाठीं जवळजवळ उर्णीपुरीं तेवढींच पानें खर्ची घातलीं आहेत. शिवाय श्री. अनंतराव आठवले यानीं श्रीदासगणू महाराज यांच्या काव्यवाङ्मयाचे जे दहा खंड प्रसिद्ध केले आहेत, त्या प्रत्येक खंडांत विषय कोणकोणते आले आहेत, याचीही माहिती करून दिली आहे. महाराजांचे व त्यांच्या सच्छिष्यांचे कांहीं फोटोही या ग्रंथांत देण्यांत आलेले आहेत. साधारणपणें एवढ्यावरून या ग्रंथाची साधारण कल्पना वाच-कांस करतां येईल.

श्रीदासगणू महाराज (१८६८ ते १९६२) हे गेल्या सहा-सातशें वर्षांच्या दीर्घ कालावधींत जे संतमहात्मे होऊन गेले त्या मालिकेंत बसणारे आधुनिक काळांतील एक थोर संतकवि होऊन गेले. बालपण उनाडक्या करण्यांत गेलें, शाळेंतील शिक्षणाकडे फारसें लक्ष नव्हतें. उपजत हुषारी होती. तसाच हूडपणाही पराकाष्ठेचा होता. त्यांना शिस्त लागावी व शिक्षणाकडे लक्ष लागावें या हेतूनें त्यांच्या मामलेदार चुलत्यानें त्यांना जवळ केलें होतें. परंतु तेथेंही तोच प्रकार. त्यांचें हें लक्षण पाहून एकेदिवशीं त्यांची चुलती त्यांना म्हणाली होती कीं.

"डौल मिरवूं नकोस गणपती, शेवटीं आमच्याच नावावर विकावें लागेल तुला! मी अमक्याचा पुतण्या आहें, याच पतीवर तोंड वेंगाडून तुला पोट भरावें लागेल ! खूप समजून रहा !"

ते शब्द स्वाभिमानी गणपतीच्या हृदयाला जाऊन झोंबले. त्या वयांतही त्यांचा बाणेदारपणा जोरानें उफाळून वर आला ! मग त्यानीं काय करावें ?

त्यांनीं त्याचक्षणीं तें घर कायमचें सोडलें आणि सोडतांना ते आपल्या चुलतीला म्हणाले "काकू ! या घरचें पाणी पिण्यासही मी येथें थांबणार नाहीं ! मात्र पक्कें लक्षांत ठेव कीं, कांहीं झालें तरी मी तुमचें नांव सांगणार नाहीं. लौकिक मिळविला वा उपाशीं मेलों तरी माझ्या एकट्याच्याच नांवावर सर्व करीन !"

दासगणू असें बाणेदार उत्तर देऊन त्या वयांत जे बाहेर पडले ते कायमचे. त्याच नगर शहरांत त्यांचे एक जिवलग मित्र होते त्यांच्या घरीं ते जाऊन राहिले.

त्यानंतर मासिक नऊ रुपये पगाराची त्यांना पोलिस खात्यांत नोकरी मिळाली. नोकरी कष्टाची, त्रासाची तशीच भारी जबाबदारीची. त्या खात्यांत ते सुमारें अकरा वर्षें होते. त्यांच्याठायीं बालवयापासून काव्यप्रतिभा दांडगी होती. पोलिस खात्यांत असतां ती प्रतिभा त्यानीं लावण्या, पोवाडे करण्यांत खर्च केली. तमासगीरांशीं व लावण्या छक्कडीशीं त्यांचा निकट संबंध आला व त्यांतच ते रममाण होऊं लागले. त्या खात्यांत असतां त्यांना एका सद्गुरूची भेट केवळ योगायोगानें झाली. श्रीसद्गुरू वामनशास्त्री इस्लामपूरकर हें त्यांचें नांव. त्यांच्यावर त्यांची आत्यंतिक निष्ठा होती. त्यांच्याकडून त्यानीं गुरुमंत्रही घेतला.

वामनशास्त्रींचा अंतकाळ जवळ आला होता. व त्यांना तो माहीतही होता. त्यांना आपला देह काशीक्षेत्रीं ठेवावयाचा होता. तिकडे जाण्यापूर्वी त्यांनीं दासगणूंचा निरोप घेतला तेव्हां तो दुःखावेग आवरणें त्यांना (श्री.दासगणूना) अशक्य झालें तेव्हां वामनशास्त्री यानीं त्यांना शेवटी एवढेंच सांगितलें कीं, "वेड्यासारखें दुःख करूं नकोस. हा मुळीं मृत्युलोकच आहे. त्यांतूनही मी नित्याचाच दुरावलों असें थोडेंच आहे ! १।२ वेळां तूं शिरडीला गेला होतास ना ? श्रीसाईबाबा योग्य विभूति आहेत; त्यांना माझेंच स्वरूप मान. तेच यापुढें वेळोवेळीं तुला मार्ग दाखवितील."

आणि त्या क्षणापासून श्रीदासगणूंची श्रीसाईबाबांच्या ठायीं जी श्रद्धा बसली ती शेवटपर्यंत.

आणि त्यानंतरच्या काळांत श्रीसाईबाबांनीं त्यांच्या जीवनांत आस्ते आस्ते परंतु आमूलाग्र क्रांति घडवून आणिली. पोलिस खात्यांत असतां त्यांच्यावर जे १–२ दुर्धर प्रसंग आले त्यांतून त्यांचा बचाव केला. त्यांना अखेर पोलिस खात्यांतील नोकरीचा राजीनामा द्यायला लाविलें व त्यांचें लक्ष सर्वस्वी संतकवींचें गुणगान करण्याकडे व भक्तिभावाकडे वळविलें.

अशा रीतीनें श्रीदासगणू महाराजांच्या जीवनांत श्रीसाईबाबांचें स्थान जसें फार मोठें आहे, त्याचप्रमाणें श्री साईबाबांच्या चरित्रांतही श्री दासगणूंचें स्थान महत्वाचें आहे.

संत–चरित्र कथनाच्या दृष्टीनें ज्यांना पूर्वकालीन कवि महीपतींचीच उपमा देणें शोभेल अशा. या श्रीसाईभक्ताचें सुटसुटीत चरित्र श्री. मधुकर जोशी यानीं लिहून संतचरित्र विषयक वाङ्मयांत बहुमोलाची व उपयुक्त भर घातली आहे.

---

● संतकवि श्रीदासगणू महाराज दर्शन. लेखक : मधुकर दत्तात्रय जोशी. प्रकाशक : संतकवि दासगणू महाराज. शतसांवत्सरिक समिति. आनंदीदास लव्हेकर (आनंदी-भुवन) नांदेड. किंमत : पांच रुपये.

# कृपासागर श्रीसाईबाबा

## अवतार कार्यावर ओझरता दृष्टिक्षेप

श्रीसाईबाबानीं जनतेला भक्तिपंथाकडे वळविलें. त्यांच्या आगमनानंतर भक्तिभाव वाढीस लागला. जनता या महापुरुषाची अत्यंत ऋणी आहे. ते आले आणि त्यांच्या भक्तमंडळींत एकदम केवढें तरी स्थित्यंतर घडून आलें. भक्तिभावाची वाढ झाली एवढेंच नव्हे तर त्यांच्या पासून प्रकाश मिळवून अनेक संतमंडळी पुढें आली. साईबाबा हे कृपासागर होते. दुसऱ्यांचीं दुःखें पाहून त्यांचें अंतःकरण अतोनात कळवळत असे. त्याना दुःखयुक्त करण्यासाठी ते परोपरीनें झटत असत. त्यांनीं ज्या कांही लीला केल्या त्या केवळ जनतेच्या कल्याणासाठीं.

बाबांचें सारेच कांहीं विलक्षण होतें. त्यांचें व्यक्तिमत्त्व भक्ताच्या अंतःकरणाचा ठाव घेणारे होतें. रोजच्या रोज जनकल्याणासाठीं त्यांच्याकडून चमत्कार घडत असत. त्यांच्या जन्माचा ठावठिकाणा आजवर कुणालाही लावतां आला नाहीं. त्यांचा जन्म, जन्मग्राम व इतर गोष्टींचा शोध करणाऱ्या चरित्रकाराला शेवटी हतबुद्धच व्हावें लागतें.

## बाबांचें आगमन

शिरडी हें नगर जिल्ह्यांतील एक लहानसें अज्ञात खेडें. सुमारें शंभर वर्षांपूर्वीं फकीराच्या वेषांत त्या खेड्यामध्ये वीस वर्षें वयाचा एक तरुण अवतरला. त्याच्या हातांतील भिक्षापात्र हीच काय ती त्याच्याजवळ असलेली सारी धनदौलत. त्या गावांत त्यांनीं प्रवेश केला आणि एका निंबवृक्षाच्या छायेंत ते बसले. तेथें येऊन त्यांनीं काय केलें ? अग्नी प्रज्वलित केला. प्रकाश पाडला आणि तो अग्नी शेवटपर्यंत आणि आजपर्यंतही सतत पेटतच आहे !

त्या गावांत त्यांनीं वस्ती केली. कोणाकडून कशाचीही अपेक्षा केली नाहीं. भूक लागल्यासारखी वाटली म्हणजे गावांतील २।४ घरें हिंडावीं आणि भाकरीचे तुकडे जमा करावे व क्षुधा शांत करावी, असा हा त्यांचा त्याकाळीं नित्याचा कार्यक्रम होता. ते स्वतःशींच कांहीं ना कांहीं बडबडत असत. असेल कोणी तरी वेडा फकीर ! ही होती आरंभकाळांत बहुजनांची कल्पना.

परंतु खरा हिरा का कधीं कुठें दडून रहाणार ? त्याची चमक कधीं ना कधीं डोळ्यांत भरायचीच ! आणि तसंच झालें. त्यांचें आत्मतेज प्रभावशाली होतें. तें दडून कसें राहील ? फुलाला जसे मधासाठीं भुंगे जिथून तिथून येऊन चिकटतात, तसे लोक आस्ते आस्ते त्यांच्याठायीं असलेल्या आत्मतेजामुळे त्यांना येऊन चिकटूं लागले.

ईश्वरी कृपेमुळें कांहीं माणसांत एखाद्याच्याठायीं असलेलें साधुत्वाचें तेज ओळखण्याची शक्ति निर्माण झालेली असते. त्यांना ती जाणीव तात्काळ होते. महायोगी, तो कोठेंही असो. आपल्याठायीं असलेल्या तेजोकिरणांच्या बळावर तो असंख्य लोकांना खेचून आणूं शकतो, लोक त्याच्याकडे धांव घेऊं लागतात. सत्संगाची ओढ प्रत्येकाला लागून राहिलेली असते. ती ओढ माणसास स्वस्थ बसूं देत नाहीं. त्या महाभागाचे दरवाजे सदासर्वकाळ कोणालाही उघडे असतात. तेथें मज्जाव कोणालाही नसतो. मग तो श्रीमंत असो वा गरीब असो; पापी असो वा पुण्यवान असो.

## जीवन गुलदस्तांत

वर सांगितल्याप्रमाणें साईबाबा हे एक असामान्य कोटींतील सत्पुरुष आहेत. त्यांचा जन्म कधीं व कुठें झाला आणि त्यांचे वाडवडील कोण हें आजवर कोणाला निश्चितपणें सांगतां आलें नाहीं. ते शिरडीगावांत आले, त्यापूर्वीचें त्यांचें जीवन गुलदस्तांत आहे. म्हणजे त्याची कोणी कल्पना करूं देऊं शकत नाहीं. एवढेंच माहीत आहे कीं, वयाच्या सोळाव्या वर्षी लग्नाच्या एका वरातीबरोबर ते प्रथम शिरडींत प्रवेश करते झाले. तेथें ते तीन वर्षे राहिले आणि नंतर जे नाहींसे झाले ते पुन्हां १८५८ च्या सुमारास परत आले. आणि नंतर मात्र त्या गावांत त्यांनीं स्वतःच्या वास्तव्यासाठीं एक जागा मुकर करून तेथें ते सुमारें ६० वर्षे सतत राहिले. कुठपर्यंत ? १९१८ साली महासमाधि घेईपर्यंत !

आणि त्या एकांत, एका बाजूच्या खेड्यांत स्थायिक झाल्यानंतर त्यांनीं आपल्या लीला प्रसंगानुरूप प्रगट करण्यास आस्ते आस्ते प्रारंभ केला. ते केवळ प्रेममूर्ति होते. प्रेमाच्या माणसाजवळ कोण बरं येणार नाहीं ? जवळचे नि दूरचे असंख्य स्त्रीपुरुष त्या गावीं त्यांच्या दर्शनासाठीं नि त्यांच्या कृपाप्रसादासाठीं येऊं लागले. केवळ स्वयंस्फूर्तीनें !

## सारेंच विचित्र !

साईबाबानीं स्वतःसंबंधीचें म्हणजे धर्म, आईवडील, जन्मग्राम वगैरे

संबधीचें गौप्य तसेंच कायम राहूं दिलें. त्याचा परिस्फोट कधींही होऊं दिला नाहीं. हिंदूना वाटे कीं जे आपल्या धर्मांत अनेक अवतार होऊन गेले, त्यांपैकी हा एक अवतार आहे, तर मुस्लीमांस वाटायचें कीं, अल्लानें पाठवून दिलेला हा एक पीर आहे. मौज अशी कीं, प्रत्येक धर्मीयास ते आपल्याच धर्मांतील एक श्रेष्ठ पुरुष आहेत, असें वाटावें. अशा रीतीनें या शिरडीच्या सत्पुरुषानें सर्वांची मति गुंग करून सोडली. ते फकीराप्रमाणें वेष करीत आणि हिंदूप्रमाणें सर्व शिष्टाचार भक्तांकडून करून घेत. ते राहात एक मशिदींत आणि तेथें अखंड धुनी पेटती ठेवीत असत ! आपल्या मुस्लीम भक्तांपुढे कुराणांतील वचनांचा उच्चार करून ते त्यांना आनंद देत असत, त्याचप्रमाणे हिंदूना त्यांच्या शास्त्रपुराणांतील वचनांनीं गुंगवून सोडीत असत. मोठ्या नवलाची गोष्ट म्हणजे हिंदु व मुस्लीम समाजांतील अगदी कट्टे धर्माभिमानी लोक त्यांच्यापुढें येऊन त्यांना दंडवत घालीत असत.

## अनन्यसाधारण विभूती

अशी ही असामान्य विभूती होती. आत्यंतिक दयावंत व मानवजातीबद्दल आत्यंतिक करुणा वाटणारी ही अनन्यसाधारण विभूति होती. गॅलिलीच्या समुद्रपृष्ठावरून सहज लीलेनें चालत जाणाऱ्या भगवान नाझारीननंतर केवळ लोककल्याणासाठीं, मानवजातीच्या कल्याणासाठीं आपल्या हयातींत आणि तदनंतरही कोणालाही आश्चर्याचा धक्का देणारे चमत्कार घडवून आणणारा दुसरा महापुरुष अलीकडच्या काळांत तरी क्वचित्‌च आढळून येईल. कोणीही दुःखी–कष्टी होऊन किंवा निराशेला कवटाळून राहूं नये, ही होती त्या महाभागाची दृष्टि.

अशा या दयासागराकडे सर्व प्रकारचीं माणसें त्यांच्या भेटीसाठीं येत असत, यांत नवल तें कसलें ? ज्ञानी व अज्ञानी, गरीब व श्रीमंत, खालच्या त्याचप्रमाणें वरच्या वर्गांतील सारे स्त्री पुरुष त्यांच्या दर्शनाचा लाभ घेण्यासाठीं प्रत्यहीं येऊं लागले. नाना प्रकारच्या दुःखांनीं पोळलेले नि गांजलेले लोक दुःखापासून सुटका व्हावी म्हणून त्यांची प्रार्थना करूं लागले, त्यांच्या पायाशीं येऊं लागले व प्रेमाचा मंत्र घेऊन, दुःखमुक्त होऊन जाऊं लागले. कोणाला संपदा पाहिजे, कोणाला रोगांपासून मुक्तता पाहिजे तर कोणाला संतति पाहिजे. मानवाचीं दुःखें ! त्यांना अंत ना पार ! तीं विविध स्वरूपाचीं असायचीं. बाबांनीं सर्वांचीं दुःखें शांतपणें ऐकून घ्यावीं व त्यांचें निराकरण करून घेण्याच त्यांना मार्ग दाखवावा व त्यांना भक्तिभावाकडे वळवावें.

## लोकविलक्षण चमत्कार

जीझस ख्राईस्टनें लोकांना भक्तिमार्गाकडे वळविण्यासाठी त्याकाळीं नाना चमत्कार करून दाखविले, जनता त्यामुळें आश्चर्यानें थक्क झाली. भगवंताची करणी अगाध आहे ही खूणगांठ प्रत्येकानें बांधिली. त्यानंतर तसे अद्भुत चमत्कार करून दाखविणारी दुसरी थोर बिभूति म्हणजे श्रीसाईबाबा हेच होत. त्यांचा जो पहिला लोकविलक्षण चमत्कार जनतेच्या मनावर ठसठशीतपणें ठसला तो म्हणजे पणत्यांत घालायला तेल मिळालें नाहीं म्हणून त्यांत केवळ पाणी घालून त्यांनीं साऱ्या पणत्या पेटविल्या व त्या दीर्घकाळ तशाच पेटत राहिल्या, हा होय. बाबानीं कित्येक वेळां प्रसंगोपात परकायाप्रवेश करून ती ती वेळ शोभविली आहे.

बाबाचे असे किती चमत्कार सांगावेत? नाना प्रकारच्या रोगांनीं पछाडलेले असंख्य रोगी त्यांच्याकडे मोठ्या आशेनें येत असत. त्यांत कित्येक रोगी तर असाध्य असत. परंतु त्यांना दयाळूपणें दिलासा देऊन त्यांनीं दुःखमुक्त केलें आहे. या गोष्टीचा येथें केवळ ओझरता उल्लेख करण्यांत येत आहे. अशीं किती तरी उदाहरणें त्यांच्या हयातींत जशीं घडून आलीं तशींच नंतरच्या काळांतही घडून आलीं आहेत. त्यांच्या कृपेनें आंधळ्यांना दृष्टिलाभ झाला, पांगळ्यांना चालतां येऊं लागलें! आणि बहिऱ्यांना ऐकूं येऊं लागलें! दुःखितांचें दुःख दूर करण्याचें बाबांचें भूतदयेचें कार्य त्यांच्या मागें आजही चालू आहे. जेथें निष्ठा आहे तेथें बाबा आहेत.

बाबा अंतर्ज्ञानी होते. त्यांचे भक्त मग ते कोठेंही व कोणत्याही स्थितींत असोत. ज्यांना त्यांची आठवण होई, त्यांची बाबाही आठवण करीत असत. त्यानीं सांगून टाकलें आहे कीं, तुम्हीं कोणी कुठेंही असा. तुमच्या हालचाली, तुमच्या खबरा मला समजल्याशिवाय रहात नाहींत. हजारों मैलांवर असलेल्या आपल्या भक्तांचे विचार व त्यांची स्थिति अंतर्ज्ञानानें त्यांना समजत असे. वर्तमान काळाप्रमाणें भूतकाळ व भविष्यकाळही त्यांना बरोबर समजत असे.

## साधना कुठें गेली ?

साईबाबानीं कुठें ना कुठें बसून साधना किंवा तपस्या केली असें कोणी कधीं पाहिलें नाहीं. उपासनी बाबा किंवा गोदावरीमाता व इतर अनेकांची साधना व तपस्या आपण समजूं शकतों. बाबानीं बालपणींच्या काळांत जरूर ती साधना किंवा तपस्या केली असेल असें कोणी म्हणतील. परंतु त्याला पुरावा काय ? १५।२० व्या वर्षी त्यानीं शिरडींत प्रवेश केला आणि त्या वेळेपासून त्यांना साधना करतांना कधीं कोणी पाहिलें नाहीं. ते शिरडींत आले तेच पूर्णत्वानें ! आमच्या पुराणासंबंधीं, वेदउपनिषदांसंबंधीं तसेंच कुराण ग्रंथासंबंधीं त्याचें ज्ञान कोणालाही थक्क करून सोडणारें होतें. मोठमोठे शास्त्री, पंडित नि तत्त्वज्ञ त्यांचें तें ज्ञान पाहून आश्चर्यानें थक्क होत असत.

त्यांचें मन हें सर्वसाधारण माणसासारखें नव्हतें. तें असामान्य स्वरूपाचें व अगाध होतें. त्याचा थांग कधीं कोणाला लागला नाहीं. बाबा स्वयंसिद्ध होते. वाटेल त्या बिकट प्रश्नाची उकल ते सहज रीतीनें व लीलेनें करीत असत. त्यासाठीं त्यांना कोणताही ग्रंथ वाचावा लागत नसे हें विशेष होय. ते अंतर्ज्ञानी होते. स्वयंभू सिद्ध पुरुष होते. जें सर्वसाधारण बुद्धिवंताला आकलन करतां येत नाहीं, त्याचें आकलन ते सहज सुलभतेनें करीत असत.

### बाबांचें त्यागी जीवन

बाबांचें जीवन व त्यांची रहाणी शेवटच्या घटकेपर्यंत अत्यंत साधी असे. ते सर्वसंगपरित्याग केलेले एक महायोगी होते आणि शेवटपर्यंत ते तसेच राहिले. त्यांच्याकडे संपत्तीचा ओघ लागून राहिला होता. त्यांना काय कमी होतें ? वाटेल तेवढा पैसा त्यांच्याकडे सतत चालून येत होता. त्यांनीं मनांत आणलें असतें तर ते एखाद्या राजाप्रमाणें राहूं शकले असते व राजवैभव भोगूं शकले असते. परंतु शेवटपर्यंत त्यांनीं एखाद्या भिक्षेकऱ्याप्रमाणें आपलें जीवन घालविलें. दुपारची भूक भागविणें जरूर म्हणून ते चार घरें फिरून भाकरीसाठीं भिक्षांदेही करीत राहिले ! त्यानीं आपला वेष-पोषाख कधींही बदलला नाहीं. पायघोळ कफनी व डोक्याला गुंडाळलेलें एक फडकें ! अंगावरील कफनी फाटून जाईपर्यंत किंवा कोणा भक्ताचें लक्ष जाऊन त्यानें ती विनवणीपूर्वक बदलल्याशिवाय तिच्यांत कधीं बदल होत नसे.

बाबा अशारीतीनें राहिले. कडक धोरणानें राहिले; परंतु आपल्या भक्तांनींही तोच मार्ग स्वीकारावा, त्यांनींही कपड्या-लत्त्यांचा शोक करूं नये, अशी अपेक्षा त्यानीं कधीही केली नाहीं. सर्वांनीं आपल्या मर्जीनुरूप सुख-समाधानांत राहावें असें त्यांना वाटत असे.

कोणी दुःख किंवा हालताप सोसावे असें त्यांना कधी वाटलें नाहीं; त्यांचें अंतःकरण अत्यंत कनवाळू होतें. प्रत्येक माणसानें स्वतःची पातळी उंच करावी. कोणीही खालीं पडून राहूं नये. ज्ञानमार्गाची, भक्तीभावाची कांस घट्ट धरून प्रत्येकानें आपला उद्धार करून घ्यावा, हीच त्यांची आकांक्षा असे. ख्राईस्टप्रमाणें, छोट्या छोट्या कथा सांगून उच्च धर्मतत्वें ते आपल्या शिष्याच्या मनावर बिंबविण्याचा यशस्वी प्रयत्न करीत असत. प्रत्येकानें नीतिधर्मानें वागावें, आपलें आध्यात्मिक ध्येय भक्तिमार्गानें जाऊन साध्य करून घ्यावें, अशी त्यांची शिकवण असे.

## बाबांचा उपदेश

बाबा जोंपर्यंत या जगांत वावरत होते तोंपर्यंत आपल्या सन्निध आलेल्यांना योग्य मार्गाला लावीत होते व स्वतःला ओळखण्याचा प्रयत्न करा, असें परोपरीनें मनावर बिंबवण्याचा प्रयत्न करीत होते. जनता सुखी व सन्मार्गगामी व्हावी, असें त्यांना फार वाटत असे. 'मी कोण आहें ? येथें कशासाठीं आलों ? याचें चिंतन नेहमीं करा. स्वतःला जाणून घ्या. तेवढी जाणीव झाली म्हणजे मग तुमचा पुढील मार्ग सहजरीतीनें सुलभ होईल. गाफील राहूं नका.' असें आपल्या भक्तांना ते नेहमीं सांगत असत. परंतु हें कसें साध्य होईल याचाही मार्ग त्यांनीं दाखवून दिला. भगवंताला सर्वतोपरि शरण जा. किंवा सद्गुरूला तरी शरण जा म्हणजे तुमचा मार्ग तुम्हांला आपोआप सांपडेल. बाबानीं अशारीतीनें भक्तांना भक्तीमार्गाची शिकवण दिली.

ता. १५ आक्टोबर १९१८ रोजीं त्यांनी देहाचा त्याग केला. त्यावेळीं त्यांच्या असंख्य भक्तांना असह्य नि पराकाष्ठेचे दुःख झालें. ताटातुटीमुळें दुःख होणें स्वाभाविक होतें; परंतु त्यांनीं आपल्या भक्तांना आश्वासन दिले कीं, "मी शरीरानें तुमच्यांतून गेलों असलों तरी मी तुमच्यतांच वावरत आहें असें समजा.

मीतुमच्यापासून मुळींच दूर नाहीं. जेव्हां जेव्हां श्रद्धापूर्वक माझी आठवण कराल. तेव्हां तेव्हां तुमच्या हांकेसरसा मी धावत येईन. ”

## आजहि अस्तित्व जाणवतें

बाबांच्या प्रयाणास आतां पन्नास वर्षें होत आलीं तरी आजही त्यांचें अस्तित्व व त्यांचें कर्तृत्व पूर्णवत् जाणवत आहे. संकटांत सांपडलेल्या नि त्यांचें स्मरण करणाऱ्यांस आजही त्यांचें अस्तित्व जाणवत आहे, ही आश्चर्याची गोष्ट नव्हे का ? मानवजातीवर त्यांचें किती अलोट प्रेम होतें व भूतदयेनें ते किती भारले गेले होते, हें यावरून दिसून येतें.

आपल्या भक्तांना, वर म्हटल्याप्रमाणें त्यानीं पुन्हां पुन्हां सांगून ठेविलें आहे कीं, “ बाबांनो, मी दृष्टिआड झालों असें समजूं नका. मी सदासर्वकाळ तुमच्याजवळ आहें असें समजून वागत जा. ”

बाबा म्हणाले होते कीं, “ तुम्हीं कोणत्याही प्रकारची चिंता करूं नका. मी जवळ असल्यावर चिंता करण्याचें कारणच काय ? तुमची दुःखें कोणत्याही प्रकारचीं असोत, तीं श्रद्धापूर्वक माझी आठवण करून माझ्यापुढें ठेवा आणि मग पहा काय चमत्कार घडून येतो तो ! ” तुम्हीं माझ्याकडे प्रेमाच्या व श्रद्धेच्या दृष्टीनें पहा, मग मीही तुमच्याकडे पाहीन व तुमच्या हांकेला ओ देईन. ”

बाबानीं भक्तांना दिलेला हा केवढा दिलासा आहे बरें ? त्यांत ममताळू-पणा, प्रेम व तुमच्या कल्याणाचें सर्वस्व सांठून राहिलें आहे.

बाबा पूर्वीप्रमाणें आजही भक्तांना संकटमुक्त करीत आहेत. त्यांत त्यांचा एकमेव हेतू म्हणजे लोकांनीं सुखासमाधानांत रहावें. भक्तिमार्गाची कांस धरून स्वतःचा उद्धार करून घ्यावा.

वर्षांमागून वर्षे लोटलीं. थोडी थोडकीं नाहींत तर पन्नास वर्षें ! आणि या एवढ्या कालावधींत बाबा आमच्यापासून दूर गेलेले नाहींत, आमच्या सुखासाठीं नि आमच्या शाश्वत कल्याणासाठीं आजही ते आमच्यांत वावरत आहेत. आजही पूर्वापेक्षा अधिक आस्थेनें ते आपल्या भक्तांच्या कल्याणासाठीं व उद्धारासाठीं झटत आहेत.

## संसारांतील चिंता

आजकाल प्रत्येक माणूस संसारांतील चिंतेनें करपून जात आहे. नाना प्रकारच्या चिंता ! सुख आहे कुठें ? परंतु नाहीं; कोणीही निराशेचे उद्गार काढण्याची जरुरी नाहीं. या दुःखी संसारांत तुम्हांला आशेचा संदेश देणारे बाबा तुमच्या जवळपास असतां तुम्हीं दुःख करायचें आणि निराश तरी कां व्हायचें ? बाबा म्हणजे कृपेचा सागर !

खरोखर या दुःखी-कष्टी संसारांत आशेचे किरण कोणी आणून सोडले असतील तर ते साईबाबांनीं ! बाबा म्हणजे आमचें सर्वस्व, निराशेंत आशा दाखविणारे, दुःखातून सुखाकडे घेऊन जाणारे बाबा ! किती लक्षावधि लोकांना या संसारात त्यांच्यामुळें दिलासा मिळाला आहे व किती जणांना त्यांच्या कृपाछत्राखालीं आल्यामुळें सुखाची सावली लाभली आहे, याची कोणीही अचूक कल्पना करूं शकणार नाहीं.

आज हजारो, नव्हे लक्षावधि लोक त्यांच्याकडे मोठ्या आशेनें नि उत्कंठेनें पहातात ते उगाच नाहीं. त्यांच्या चरणाजवळ सर्व सुखाचा ठेवा आहे; आपल्या अडचणी नि दुःखें दूर करण्याचें सामर्थ्य येथें आहे अशी प्रत्येकाची मनोमन साक्ष पटली आहे.

आणि अशा या महापुरुषाच्या पुण्यतिथीचा सोहळा आतां लौकरच, म्हणजे सप्टेंबर आक्टोबरमध्यें आपण साजरा करणार आहोंत. तो त्यांच्या थोरवीला साजेशा सुंदर स्वरूपांत व्हावा, यासाठीं आम्हीं झटूं या व त्यांत शक्य त्या परीनें सामील होऊं या.

---

—मनुष्यप्राणी नाना प्रकारच्या आशा आकांक्षांनीं बांधला गेला आहे. त्याला वाटतें आपण खूप वर्षें जगावें. त्याला वाटतें आपणास खूप धनदौलत मिळावी. त्याला वाटतें आपण नाना प्रकारचे सुखोपभोग भोगावे. त्यामुळें होतें काय ? मनुष्य व परमेश्वर यांच्यांत ताटातूट पडत असते. अशा प्रकारचा माणूस देवापासून फार दूर अंतरावर रहात असतो. देवासन्निध जावयाचें तर सर्व आशांचा चक्काचूर करून टाकला पाहिजे !

# श्री साईबाबा फाऊंडेशन

## कार्याची थोडक्यांत रूपरेषा

सर्वांनीं सुखांत, आनंदांत नि समाधानांत रहावें, या हेतूनें श्री साईबाबा फाऊंडेशनची स्थापना बाबांच्या सुवर्ण-महोत्सवी पुण्यतिथीनिमित्त करण्यांत येत आहे. बाबांचा अवतार जनता-कल्याणासाठीं होता. तो हेतु ज्या ज्या मार्गांनीं सिद्धीला जाईल त्या त्या मार्गांचें अवलंबन करणें, हाच ही संस्था स्थापन करण्यामागील मूलभूत उद्देश आहे.

निरनिराळ्या क्षेत्रांत ज्यांनीं नांव मिळविलें आहे, ज्यांना जनता-कल्याणाची अहर्निश काळजी वाटते अशीं माणसें या फाऊंडेशनमध्यें सामील झालीं आहेत.

जनता-कल्याणाच्या मूलभूत गोष्टी कोणत्या, कोणकोणत्या मार्गांचें अवलंबन गेलें असतां जनता सुखांत नि समाधानांत राहूं शकेल, याचा विचार करून त्याप्रमाणें पावलें टाकण्याचा चालकांचा विचार आहे.

योग्य मार्गांनीं शिक्षणप्रसार, आरोग्यरक्षणासाठीं वैद्यकीय मदतीची सोय, गरजवंताच्या गरजा दूर करणें, खेड्यांतील जनतेचें राहणीमान वाढवून त्यांच्या जीवनाशीं एकरूप होऊन राहिलेल्या शेती-बागायतीच्या बाबतींत त्यांना जरूर ती सहकार देणें, समाजांत वावरून व मिसळून समाजोन्नतीसाठीं झटणारे त्यागी व सेवाभावी कार्यकर्ते निर्माण करणें, ज्यांना नोकरी-धंदा नाहीं त्यांना तो मिळवून देणें, अपंगाची सोय लावणें वगैरे अनेक ध्येयें या फाऊंडेशनमध्यें समाविष्ट करण्यांत आलीं आहेत.

शिक्षणप्रसारच्या क्षेत्रांत या संस्थेपुढें कोणकोणतीं उद्दिष्टें आहेत ?

या संस्थेच्या संचालक-मंडळात शिक्षणतज्ञ माणसें आहेत. शिक्षणांत धर्माला, अध्यात्माला अधिष्ठान असलें पाहिजे असें त्यांना वाटतें. ती दृष्टि समोर ठेऊन जेथें शक्य व जरूर वाटेल अशा ठिकाणीं शैक्षणिक संस्था स्थापन करण्यांत येतील किंवा स्थापन झालेल्या संस्था चालविण्यासाठीं घेण्यांत येतील. वरील उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं जरूर व शक्य तेथें महाविद्यालयें स्थापन करण्यांत येतील. विद्यार्थ्यांच्या परिक्षा घेऊन उत्तीर्ण होणाऱ्यांस डिप्लोमा व सर्टिफिकेटें देण्यांत येतील.

जरूर त्यांना मोफत शिक्षण दिलें जाईल, योग्यतेनुसार शिक्षणवृत्त्या देण्यांत येतील. ज्यांना शिक्षण क्षेत्रांत आर्थिकमदतीची जरूरी लागेल, ती त्यांना देण्यांत येईल.

विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी वसतिगृहें स्थापन करून तीं चालविण्यांत येतील: विद्यार्थ्यांच्या मार्गांत जेवणाखाण्याची अडचण उपस्थित होऊं नये याबद्दल खबरदारी घेण्यांत येईल.

जनतेच्या हातांत मार्गदर्शक, धार्मिक नि नीतिसंवर्धक वाङ्मय पडावें या हेतूनें ग्रंथप्रकाशन, नियतकालिकांचें व पत्रकांचें प्रकाशन वेळोवेळीं करण्यांत येईल.

वाचकांना धार्मिक, नैतिक व जीवनांत उपयोगी पडणारें असें वाङ्मय सहजगत्या उपलब्ध व्हावें, या हेतूनें ग्रंथालयें स्थापन करणें नि चालविणें व ग्रंथ वाचनास प्रोत्साहन देणें, या ज्ञानसंवर्धक मार्गांकडे शक्य तेवढें लक्ष पुरविण्यांत येईल.

इतिहास, शास्त्रें, योगविद्या व तंत्रविद्या वगैरेच्या संशोधनासाठीं जरूर त्या संस्था स्थापन करणें व तशा प्रकारच्या कार्यास मदत करणें हेंही एक उद्दिष्ट चालकांपुढें आहे.

आजकाल जनतेला वैद्यकीय मदतीची फार जरूरी जाणवूं लागली आहे. त्यासाठीं जरूर तेथें इस्पितळें, दवाखाने, आरोग्यधामें वगैरे स्थापन करण्यांत येतील.

जिकडे पहावें तिकडे अनेक माणसें शारीरिक नि मानसिक रोगांनीं दुःखी जीवन कंठीत आहेत. त्यांच्याकडे लक्ष पुरवून त्यांचें दुःख आध्यात्मिक योगिक किंवा अन्य मार्गांनीं कसें दूर करतां येईल, याचा जरूर विचार करण्यांत येईल.

वैद्यकशास्त्रांच्या बाबतींत, विशेषतः आयुर्वेदिक, युनानी, होमिओपाथी या वैद्यकीय शास्त्रांत संशोधन करण्यांत येईल व तें करणाऱ्यांस जरूर तें उत्तेजन देण्यांत येईल.

ज्या वैद्यकीय संस्था जनता-कल्याणासाठीं झटत असतील अशा संस्थांस हरप्रकारें आर्थिक सहाय्य देऊन त्यांना त्यांच्या कार्यांत जरूर तें उत्तेजन देण्यांत येईल.

गरजवंतांस जरूरीप्रमाणें व संचालकास योग्य वाटेल त्याप्र आर्थिक सहाय्य देण्याची व्यवस्था करण्यांत येईल.

आज खेड्यांतील लोकांची स्थिति सर्वपरीनें अनुकंपनीय झालेली आहे. त्यांच्या सर्वांगीण उन्नतीसाठीं झटणें व त्यांची शेतीभाती किफायतशीर होऊन त्यांचें रहाणीमान वाढेल यासाठीं झटणें.

समाजकार्याच्या दृष्टीनें आज किती तरी गोष्टी करणें जरूर आहे. हें कार्य विविध स्वरूपाचें व विविधांगी आहे. तें पार पाडण्यासाठीं तज्ञ कार्यकर्त्यांची आज फार जरूरी आहे. असे कार्यकर्ते त्यांना जरूर तें शिक्षण देऊन निर्माण करणें.

बेरोजगारी आज असंख्य लोकांस सतावीत आहे. त्यांची कुठें ना कुठें सोय लावून त्यांची संख्या कमी करण्यासाठीं झटणें; जे भुकेले असतील, ज्या विद्यार्थ्यांना जेवणाखाण्याची सोय करणें जरूर त्यांना ती सुखसोय निर्माण करून देणें. अपंगासाठीं आश्रमस्थानें निर्माण करणें.

जीवन सुखासमाधानांत कसें घालवावें, जीवनांत बहुमोल स्थान कोणत्या गोष्टींना वा गुणांना द्यायचें, हें जनतेला समजावून सांगितलें पाहिजे. त्यादृष्टीनें जें जें करतां येईल तें तें करणें.

लोककल्याणाचें हें सर्व कार्य बाबांच्या मूलभूत ध्येयांस अनुसरून करण्यासाठीं यासंस्थेजवळ जास्तींत जास्त निधि असणें जरूर आहे. तो ज्या ज्या न्याय्य व उचित मार्गांनीं मिळवितां येण्यासारखा असेल त्या त्या मार्गांचा अवलंब करून तो मिळविणें.

बाबांच्या भक्तांनीं व ज्यांना ज्यांना लोककल्याण साध्य व्हावें असें वाटतें त्या सर्वांनीं शक्तिनुसार हस्तें-परहस्तें या निधीला हातभार लावावा अशी विनंती करण्यांत येत आहे.

या निधीचा विनियोग योग्य प्रकारें नि आवश्यक तेथेंच व्हावा, त्या कार्यांत बिलकुल हयगय किंवा हलगर्जीपणा होऊं नये, या सद्धेतूनें अत्यंत जबाबदार व विश्वासार्ह असें संचालक-मंडळ नेमण्यांत आलें आहे.

# संत श्रेष्ठाचे निंदक

लेखक : द. मो. चित्रे

( The ego is the helper; the ego is the bar ) हें श्री. अरविंदाच्या योगांतील एक महत्वाचें सूत्र आहे. त्याचा अर्थ असा. कांहीं मर्यादे-पर्यंत अहंकार हा आवश्यक असतो. तो जीवनाला उपकारक ठरतो. ह्या अहं-काराच्या भोंवती जीवनाचे तंतू एकत्रित होतात व जीवनाचा पट तयार होऊं लागतो, स्वाभिमान जागृत होऊं लागतो. आणि स्वाभिमान हा प्रत्येक माणसाला अत्यंत आवश्यक आहे. स्वाभिमानशून्य प्राणी हा निर्माल्यवत् होय.

ह्या स्वाभिमानाचें जेव्हां दुरभिमानांत रूपांतर होतें तेव्हां मात्र त्याला पायबंद घालणें जरूरीचें होतें. हा पायबंद घालण्यांत निंदक फार उपकृत ठरतात. दोष धुंडाळून काढणें आणि त्याच्यावर प्रहार करणें हेंच तर निंदकांचें काम आणि म्हणूनच श्री. तुकाराम महाराज म्हणतात, "निंदकाचें घर असावें शेजारीं"

"निंदक तो परउपकारी । काय वर्णूं त्याची थोरी । जो रजकाहुनि भला परि । सर्व गुणें आगळा ॥ १ ॥ ध्रु ॥ नेचे मोल धुतो फुका । पाप वरच्यावरि देखा । करीतसे साधका । शुद्ध सरते तिहीं लोकी ॥ मुख संवदणी सांगाते । अवचे सांठविलें तेथें । जिव्हा साबण निरुतें । दोष काढी जन्माचे ॥ २ ॥ तया ठाव यमपुरीं । वास करणें अघोरीं । त्यासी दंडण करी । तुका म्हणे न्हाणी ते ॥ ३ ॥" काय वर्णन करावी निंदकाची थोरवी. परिटापेक्षां मोलाचें तो करतो. परिटाला पैसा किंवा बलुते तरी द्यावें लागते. पण निंदक सर्व गुणांनीं वेगळा आहे. त्याला कांहींही द्यावें लागत नाहीं. दोपस्थळें शोधून काढण्याचें काम तो अगदीं फुकट करीत असतो. आणि दोष जर निघाले नाहींत तर मनुष्य शुद्ध कसा होणार ! म्हणजे शुद्धीकरणाचें केवढें महत्वाचें कार्य निंदक अहर्निश आणि निःशुल्क करित असतो !

"निंदा स्तुती करावी पोट । सोंग दाखवी बोभाट ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥ जटा राख विटंबना । धीर नाहीं क्षमा मना ॥ शृंगारिलें मढें । जीवें वीण जैसे

कुळें ॥ २ ॥ तुका म्हणे रागें । भलते चावळे वाकगें ॥ ३ ॥ सोंगाड्या संबंधी काय बोलावें ? वारे माप स्तुती आणि अर्वाच्य निंदा हाच ज्यांचा धंदा ते या पेक्षां वेगळे काय करणार ? गर्दे किती ही शृंगारिलेत तरी तें कधीतरी चैतन्य-मय दिसेल काय ? त्यांतील चित्शक्ति कधीच अनंतांत विलीन झाली आहे. सोंगाड्याची मढ्याशी तुलना करून श्रीसंतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनीं निंदकानें रचलेला भव्य इमला कसा जमीनदोस्त केला आहे ! सिद्धहस्त लेखकाच्या हातचा खेळ आहे हा ! संतश्रेष्ठाचें मराठी भाषेवर केवढें प्रभुत्व होतें त्याचा हा एक उत्तम नमुना आहे.

निंदकावर प्रहार करतांना श्री तुकाराम महाराज म्हणतात, " आणि कां छळावया जालासा शाहाणा । स्वहिता घातलें खाने । आडिके पैके करूनि सायास। कृपणें सांचलें धन । न जिरे क्षीर श्वानासी भक्षितां । याती तयाचा गुण। तारुण्य दशे अधम मातला । दवडी हात पाय कान ॥ १ ॥ ॥ ध्रु० ॥काय जालें यांस वायां कां ठकले । हातीं सांपडलें टाकीतसे । घेउनि स्फटिकमणी टाका चिंतामणी । नागवले आपुले इच्छे ॥ सिद्धी सेविलें सेविती अधम । पात्रा-सारिखे फळ । सिंपिला मोती जन्मलें स्वाती । वरुपले सर्वत्र जळ । कापुस पट नयेचि कारणा । तयास पातला काळ । तेंचि भुजगे धरिलें कंठीं । मा विष जाले त्याची गरळ ॥ २ ॥ भक्षूनि मिष्टान्न घृत साकर । सहित सोलुनि केळें । घालुनिया घसा अंगोळिया । वांती करूं पाहे बळें । कुंथावयाची आवडी वोंवा । उन्हवणी रडवी बाळें । तुका म्हणे जे जैसे करिती । ते पावती तैसींच फळें ॥ ३ ॥

संतश्रेष्ठाच्या नांवाच्या ऐवजीं जेव्हां सालो मालो आपलें नांव घालूं लागला तेव्हां संतश्रेष्ठ म्हणतात, नाही घाटावें लागत । एका सितें कळे भात ॥ १ ॥ ॥ ध्रु ॥ क्षीर निवडतें पाणी । चोंची हंसाचिये आणि ॥ आंगडे फाडुनि घोंगडे करी । अवकळा तये परी ॥ २ तुका म्हणे कण । भुसी निवडे कैंचा क्षीण ॥ ३ ॥ सालो मालो, अरे अभंग कोणाचा आहे हे कळण्यासाठी वेळ लागेल का रे ? हंसासमोर दुध पाणी ठेवा, तत्काळ दुध आणि पाणी वेगळें होईल. भात तयार झाला आहे किंवा नाही हें पहाण्यासाठीं फक्त एक शीत पुरेसें असतें. भुसा शोधून काढण्यासाठी एक क्षण तरी लागेल. तद्वत् तुझी स्थिती होईल रे ! कां नसत्या फंदांत पडतोस ?

तप्तमुशीचा दाह सहन केल्यावरच सुवर्णाचे सुंदर सुंदर दागिने तयार होतात. संतांना सुद्धां तप्तमुशीचा दाह सहन करावा लागतो तेव्हांच त्यांचें साधुत्व सिद्ध होतें. लोहगांवी श्रीतुकाराम महाराजांच्या अंगावर ऊन पाणी ओतलें त्याप्रसंगाच्या अभंगांत ते गातात: "जळे माझी काया लागला वोणवा । धांवरे केवढा मायबापा ॥ १ ॥ ध्रु० ॥ पेटली सकळ कांति रोमावळी । नावरे हे होळी दहन जालें। फुटोनियां दोन्ही भाग होऊं पाहे । पाहातोसी काय हृदय माझे ॥ २ ॥ घेऊनि जीवन धांवें लवलाही । कवणाचे कांही न चाले येथें ॥ ३ ॥ तुका म्हणे माझी तूं होसी जननी । आणिक निर्वाणी कोण राखे ॥ ४ ॥ कढत कढत पाणी श्रीतुकाराम महाराजांच्या अंगावर ओतलें जातें. जणूं वणवाच पेटला आहे ! आणि त्या परिस्थितींत श्रीसंतश्रेष्ठ पांडुरंगाचा धांवा करतातः बा पांडुरंगा, सोडव मला या यमयातनांतून. शरीर दाह सहन करूं शकत नाहीं, याला मी काय करूं रे ! पांडुरंगा, धांव, धांव, मला पाणी दे. अरे, तुझ्यावांचून मला गंगाजळ कोण देणार ? धांव. धांव, कटोराभर पाणी घेऊन धांव ।

मंबाजीबुवा तर संतश्रेष्ठाचे हाडवैरी. श्रीतुकाराम महाराजांना छळण्याचें व्रतच जणूं त्यांनीं घेतलें होतें ! "बरवें बरवें केलें विठोबा बरवें । पाहोनि आंत क्षमा अंगी कांटीवरी मारविलें ॥ १ ॥ शिव्या गाळी नीत नाहीं । बहु फार विटंबिलें ॥ २ ॥ तुका म्हणे क्रोधा हातीं । सोडवूनि घेतलें रे ॥ ३ ॥" हात दुखेपर्यंत मंबाजीनें श्रीतुकाराम महाराजांना मारलें ! शेवटी श्रीतुकाराम महाराजच त्याचे हात रगडावयास गेले ! सहनशीलतेची परमावधी होते इथें. शांतीब्रह्मच हें सहन करूं शकतो !

"पावलों पावलों। देवा पावलों रे ॥ १ ॥ ध्रु ॥ बरवे संचित होतें तैसे जाले रे आतां काय बोलो रे ॥ २ ॥ सोज्वळ कंटक वाटा भावें करूं गेलों रे । तुका म्हणे करूनि वेगळा केलों रे ॥ ३ ॥" "कां होती कां होती । देवा एवढी फजीती ॥ १ ॥ १ ॥ ॥ मुळी धर्म नसतों चुकलों । तो मी ऐसें चित्तीं ॥ होणार होऊनि गेलें । मिथ्या आतां खंती रे ॥ २ ॥ तुका म्हणे पुरे आतां । दुर्जनाची संगती रे ॥ ३ ॥" "सोडवा सोडवा । सोडवा, हो अनंता ॥ १ ॥ तुजविण ऐसा । कोण प्राणदाता ॥ कोणा लाज नेणां ऐसे । आणिका शरण आम्ही जातां ॥ २ ॥ तुका म्हणे सखया । माझ्या रखुमाईच्या कांता ॥ ३ ॥"

टीका ही मानवी जीवनाला उपकारक असते हें खरें; पण ती टीका जीव घेणारी नसावी. श्रीमत् आद्य शंकराचार्यांनी श्रीभगवान् गीतेवर टीका लिहीली. श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं गीतेवर ज्ञानेश्वरीच्या नांवानें टीका लिहिली. लोकमान्य टिळकांनीं गीतेवर गीतारहस्य लिहिलें. आद्य शंकराचार्य, श्रीज्ञानेश्वर, लोकमान्य हे थोर टीकाकार होते. मंबाजीबुवा व सालोमालो हे निंदक होते. "निंदकाचें घर असावें शेजारीं" असे जेव्हां संतश्रेष्ठ म्हणतात तेव्हां त्यांना टीकाकार अभिप्रेत असतात. निंदकाच्या टाळक्यावर काठी हाणावयास पाहिजे असे श्री तुकाराम महाराज म्हणतील. पण लगेच येशू ख्रिस्ताप्रमाणे पांडुरंगाला म्हणतील, "बा पांडुरंगा, क्षमा कर त्यांना. ते काय म्हणतात तें त्यांचे त्यांनाच समजत नाहीं."

---

## महात्मा होण्याचा मार्ग

दुसऱ्यांनीं आपल्या गुणांची प्रशंसा करावी अशी कधींही अपेक्षा करूं नका. ती प्रशंसा म्हणजे ती वीषमिश्रित मिठाई आहे असें समजा. माणसाला स्वतःची प्रशंसा फार प्रियकर असते. ती चटक लावून घेऊं नका. एकदां का त्या मिठाईशीं संवय झाली म्हणजे तिच्याशिवाय चैन पडणार नाहीं. मग त्याला स्वतःच्या ठायीं असलेल्या दोषांची जाणीव रहात नाहीं. त्यांचा विसर पडत जातो. स्वतःची स्तुति कानांनीं ऐकूंच नका. ऐकायचे असले तर दोष ऐका, निंदा ( स्वतःची ) ऐका. मात्र तुम्हीं कोणतेंही निंदनीय काम करूं नका. जें जें वंदनीय त्याचा पाठपुरावा करा. जो निंदा आणि स्तुति यांच्या पलीकडे गेला तो महात्मा. तुम्हीं महात्मा होण्याचा मार्ग स्वीकारा. समबुद्धि व्हा.

---

—क्षमाशीलता हा एक मोठा व दैवी गुण आहे. दुसऱ्यांशीं वागत असतां आपल्या हातून अन्यायकारक वागणें बोलणें होणें सहाजिक आहे, परंतु त्याची जाणीव होतांच आपण क्षमा मागितली पाहिजे. एवढेंच नव्हे तर तशी चूक पुनरपि आपल्या हातून घडणार नाहीं, याबद्दल दक्षता बाळगली पाहिजे.

# नामसाधनेचें महत्त्व

लेखक : प्रा. के. वि. बेलसरे

## ( लेखांक ४ था )

### नामसाधनेची पूर्वतयारी

नामसाधना सर्व साधनांमध्यें सहजसाधना आहे. तिच्यामध्ये देहाला किंवा मनाला कष्ट न होतां भगवंताशीं अनन्य होतां येतें. नामसाधनेनें मिळणारी समाधि अवस्था ही खरी सहजसमाधि असते. याचें कारण असें कीं, भगवंताशीं अनन्य होण्यास प्रेम हा राजमार्ग आहे. आपल्या ठिकाणीं सध्यांच्या अवस्थेंत-देखील प्रेमाची अनुभूति असते. ती विकृत स्वरूपांत असते इतकेंच. आपल्याला अनेक वस्तूंबद्दल आसक्ति वाटते. आसक्ति म्हणजे मनानें चिकटणें किंवा गुंतून राहणें. वस्तूची प्रीति आणि भगवंताची प्रीति यांमध्यें जातिभेद नाहीं. प्रेम दोन्हींकडे प्रेमरूपानें सारखेंच असतें. प्रेमांत आपलेपणा, ममत्व आणि विश्वास असतो. विश्वासानें निर्भयता येऊन मन निश्चिंत बसतें. वासनेमुळे जें प्रेम आपण आज आपल्या देहावर करतों, जो विश्वास आपण आपल्या देहावर आणि पैशावर ठेवतों, तें प्रेम आणि तो विश्वास भगवंताकडे वळला कीं, आपलें काम झालें. "माझा भगवंत माझ्याजवळ आहे. आतां मला भय किंवा चिंता कसली!" असा आंतून ठाम प्रत्यय येणें हें साधन बरोबर चालल्याचें खरें चिन्ह आहे. भगवंताच्या नामाचा योग्य रीतीनें अभ्यास केल्यास हा प्रत्यय आपोआप येतो आणि भगवंताच्या प्रेमानें अंतरंग भरून जातें. भगवंताचें प्रेम मोठें उज्ज्वल आणि प्रतिभायुक्त आहे. त्याच्यापुढें जीवाचे इतर दोष जळून जातात. तें प्रेम म्हणजेच शारदेचें कल्याणकारक स्वरूप होय.

नामसाधना लवकर फलद्रूप होण्यास साधकानें कांहीं गोष्टी धरल्या पाहिजेत व कांहीं सोडल्या पाहिजेत. या गोष्टी पथ्याप्रमाणें आहेत. पुष्कळ लोक नाम घेतात पण पथ्य पाळीत नाहींत, त्यामुळें जेवढी प्रगति जलद व्हायला पाहिजे तितकी होत नाहीं. घेतलेलें नाम, कसेंहि घेतलेलें असो, कधींच वायां जात नाहीं हें जरी खरें, तरी समजून त्याचा अभ्यास केल्यास

फलप्राप्ति याच जन्मांत अनुभवास येते. साधकानें पाळायच्या गोष्टी त्या अशा- नाम आवडीनें घ्यावें, जबरीनें घेऊं नये. प्रथम थोडी जबरी लागेल पण देहाला व मनाला ताण पडेल इतकें नाम घेऊं नये. मनन अधिक करावें, वाचन कमी असावें. साधन प्रथम, इतर गोष्टी नंतर कराव्या. नाम थोडेंच घ्यावें पण तें मनापासून असावें. साधनाची वेळ निश्चित असणें चांगलें. मनाला ती संवय लागते. संशयपिशाच्च सर्व साधकांना बाधतें. जगांतील आसुरी शक्तींचा तो प्रभाव असतो. त्याची उपेक्षा करावी. नाम केवळ भगवंताच्या प्रेमासाठीं घ्यावें. प्रामाणिकपणा व तळमळ हीं नामसाधनेस प्राणासारखीं आहेत. संथपणाचा अभ्यास आणि स्थिरपणानें ध्येयनिष्ठा हीं नामसाधनेचीं दोन चाकें आहेत. बुद्धि वापरावी पण फार सांभाळून वापरावी. कारण मी मी म्हणणाऱ्यांना ती धोका देते. दिवसांतून थोडा वेळ तरी मौन व एकांत सेवावा. भगवंताची कृपा आपल्यावर असतेच. तिचा अनुभव येण्यास आपण पात्र व्हावें यासाठीं त्याच्या दयेची याचना करावी. नाम घेऊं लागलें कीं वासना बंड करते. त्याला तोंड देण्यास तयार रहावें. साधकानें टाळायच्या त्या गोष्टी अशा—रिकामा वेळ मिळाल्यास तो क्षुल्लक गोष्टींबद्दल विचार करण्यांत, क्षुल्लक वासना तृप्त करण्यांत किंवा मनोराज्यें करण्यांत घालवूं नये. साधनांत कधींहि आळस नसावा. स्वतःच्या योग्यतेबद्दल भलतीच कल्पना नसावी. अनुभवाच्या मागें लागू नये, त्यांच्याविषयीं अधिर होऊं नये. आंतून तयारी झाली कीं अनुभव मागें लागतो. नामाचा उपयोग व्यवहारासाठीं करूं नये. नाम स्वार्थासाठीं नसावें, जिज्ञासेनें नसावें, दर्शनासाठीं सुद्धां नसावें. आपलें साध्य उघड्यावर टाकूं नये. त्याला दृष्ट लागते. त्याचा परिणाम वाईट होतो. साधकानें आपणहून व्यवहाराची मर्यादा सोडूं नये. गुरूनें दिलेल्या नामाविषयीं आपली अक्कल चालवूं नये. आपल्या प्रगतीबद्दल गैरसमज कधीं न करून घ्यावा. कारण आपल्या अंतरंगांत काय भरलेलें आहे आपल्यालाच माहीत नसतें. "माझ्या हातून होणार नाहीं, मला करतां येणार नाही" असें कधींहि म्हणूं नये. साधन करीत असतां लोक आपल्याला काय बोलतात याला वाजवी- पेक्षां अधिक महत्त्व देऊं नये. दुसऱ्या साधकाबद्दल आपलें मत देऊं नये; त्याला वाईट म्हणूंच नये. स्वतःबद्दल फार बोलूं नये. अहंकाराच्या आहारी जाऊं नये. त्याचा व आपला संबंध फार दिवसांचा असल्यानें त्याला एकदम घालवून देतां येत नाहीं म्हणून त्याला एकदम घालवून देतां येत नाहीं.

म्हणून त्याला सावधतेनें सांभाळावें. सांगण्याचा मुद्दा इतकाच कीं स्वतःच्या अंतरंगाची सुधारणा व्हावी; आपल्या अंगीं भगवंताला शरण जाण्याची शक्ति यावी ही तळमळ साधकाला लागणें अवश्य असतें. नामानें ती लागते यांत शंका नाहीं; पण तिच्यासाठीं प्रयत्न केल्यास नामाचा प्रभाव त्वरित दृष्टीस पडतो हें मात्र खरें.

185

**नामाचा अभ्यास**

प्रत्येक माणसाला अप्रत्यक्षपणें भगवंताची अथवा आनंदाची गरज भासते. न कळत कां होईना तो त्याच मार्गांत असतो, हें तरी भगवंताकडे हेतुपूर्वक वळण्यास कांहीतरी निमित्त व्हावें लागतें. देहाचें आजारपण, पैशाची चणचण, प्रापंचिक अडचण, प्रियजनांचा वियोग, जीवनांतील वियोग, जीवनांतील विफलता किंवा कसलें तरी भय यांपैकीं एक किंवा अनेक कारणांनीं सामान्य मनुष्य भगवंताकडे वळतो. आपल्या संकटांत भगवंतानें आपल्याल मदत करावी अशी त्याची अपेक्षा असते. त्यासाठीं तो भगवंताची पूजा वगैरे करूं लागतो. येथें एक गोष्ट अगदीं स्पष्टपणें सांगणें जरूर आहे कीं भगवंत हा कोण लौकिक हुकुमशहा नाहीं. त्याची पूजा बरोबर केली नाहीं, त्याला प्रसाद वगैरे बरोबर दिला नाहीं, त्याच्या दर्शनाला नियमानें गेलें नाहीं तर तो आपल्यावर रागावतो आणि आपल्यावर प्रापंचिक संकटें आणतो. या व अशा कल्पना साफ खोट्या आहेत. अशा कारणांनीं रागावणारा आणि त्रास देणारा तो खरा भगवंतच नव्हे. वास्तविक आपलेंच शुद्ध स्वरूप म्हणजे भगवंत होय. तो आनंदरूप असून आपल्या हृदयामध्यें राहतो. आपण त्याला विसरल्यानें जेथें खरा आनंद नाहीं तेथें, म्हणजे बाह्य वस्तूंमध्यें, तो शोधण्याच्या नादीं लागतों. बाह्य वस्तु स्वाभाविकपणें धोका देणाऱ्या असल्यानें प्रपंचांतील संकटें येऊन आपल्याला आपल्या खऱ्या स्वरूपाची जाग येते. तात्पर्य, आपलें लक्ष सर्वस्वी बाहेर लागल्यामुळें असून नसल्यारखें झालेलें आपलें शुद्ध स्वरूप शोधून काढण्यासाठीं नामाची कास धरणें म्हणजे खरें भगववंताकडे वळणें होय. सगुणाशिवाय आपल्या मनाला केंद्रित होतां येत नाहीं म्हणून आनंदस्वरूपाऐवजीं सगुण भगवंताची मदत घ्यावी लागते.

कांहीं निमित्तानें मन एकदां भगवंताकडे वळलें कीं, नामाचा अभ्यास सुरू करावा. भगवंताच्या कोणत्याहि एका नामाचा तोंडानें जप करावा. प्रत्येक

माणसास भगवंताच्या एकाद्या रूपाची स्वाभाविक आवड असते. त्याच्या नामाचा जप करणें केव्हांहि चांगलें. पूर्वसंस्कार नसल्यानें अशी स्वाभाविक आवड नसेल तर श्रीरामाचा जप करावा. कारण राम म्हणजे ओंकारच होय. प्रथम जपास सुरवात वैखरीनें करावी. वैखरीनें जप करण्यात अत्यंत महत्त्व आहे. ही गोष्ट चांगल्यापैकीं साधकांच्याहि लक्षांत येत नाहीं. परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी अशा चार वाणी आपल्या ठिकाणीं आहेत. परावाणी ओंकारस्वरूप असल्यानें केवळ स्फूर्तिरूप आहे. पश्यन्ती वाणी अनुसंधानरूप असल्यानें सूक्ष्म देहाला व्यापून आहे. मध्यमा वाणी चिंतन आणि अनुसंधान यांना जोडणारी सांखळी असल्यानें जड आणि सूक्ष्म यांच्या मध्यें आहे. वैखरी अव्यक्ताला व्यक्तरूप देते आणि गळ्यांतून स्वरूपानें निघून तोंडावाटे शब्दरूपानें बाहेर पडते. एकाच शक्तीच्या या चार अवस्था असल्यानें त्या एकमेकीला लागून आहेत. ज्यावेळीं एकादा शब्द आपण बोलतों त्या वेळीं याच्या मागें मध्यमा, पश्यन्ती आणि परा या तिघींची सूक्ष्म हालचाल असते. असो. आपलें सगळें ज्ञान आपल्याला बाहेरून आंत घेण्याची संवय आहे. अर्थात भगवंताचें नाम देखील वैखरीनें घेऊन आपल्याला परेपर्यंत जाणें जरूर आहे. याचा भावार्थ असा कीं, नुसत्या वैखरीनें नाम घेत असतां त्याची मूळ स्फूर्ति अगदीं सूक्ष्म रूपानें परावाणींतूनच येते. नामाबद्दल मन जसजसें निःसंशय बनत जाईल तसतसें नाम आंतमध्यें पसरत जाईल. आणि तें सर्व वाणींतून चालल्याचा अनुभव आपोआप येईल. पहिल्यानें जपाची संख्या ठरवून रोज तितका जप माळेवर करावा. रोज नियमानें जप व्हावा एवढाच संख्या ठेवण्याचा हेतु असतो. जप माळेशिवाय करतां येत असेल तर तसा करावा. जपाची वेळ, जागा सुद्धां शक्यतों ठरलेली असावी. तरी हें बंधन मोठें महत्त्वाचें नाहीं. कंटाळवाणेंपणें जप करूं नये. आळसानें, प्रवासांत, सुखाच्या प्रसंगांत किंवा आजारीपणांत जप सोडूं नये. त्याचें बंड मात्र करूं नये. रोजच्या नियमाच्या जपाशिवाय दिवसांतून जेव्हां जेव्हां सवड मिळेल त्या त्या वेळीं सहज जप करावा.

नामस्मरण, सदाचरण, शुद्ध अंतःकरण आणि भगवंताला शरण अशीं नामसाधनेचीं चार महत्त्वाचीं अंगें आहेत. नामस्मरणाइतकेंच सदाचरणाला महत्व आहे. नामाचा अभ्यास करणाऱ्यानें माणुसकीला शोभेल असें वागायला हवें. त्याचें आचरण सर्व दृष्टींनीं नीतिधर्माला अनुसरून हवें. मनांत आलें तरी

शरीरानें दुष्कर्म न होईल एवढी खबरदारी बाळगावी. दुसऱ्याला फसवून पैसा घेणें, अनिर्बंध कामवासना भोगण्याच्या मार्गे लागणें, दुसऱ्याची उगीच निंदा-नालस्ती करणें, वाईट खाणें व पिणें आणि दुर्वाक्यें बोलणें या गोष्टी नामधारकानें सोडल्याशिवाय गत्यंतर नाहीं. तसेंच एखाद्याच्या हातून विशेष पापकर्म घडलें असेल तर तें त्यानें मनानें भगवंताला निवेदन करावें आणि तें पुन्हां आपल्या-कडून घडणार नाहीं अशी खबरदारी बाळगावी. नाम घेणारा मनुष्य अत्यंत सदाचरणी पाहिजे. कारण नामांत गुप्त असणारी भगवंताची शक्ति अंतःकरणांत प्रकट होण्यास विकारच आड येतात. विकार वासनारूपानें व्यक्त होतात. प्रथमावस्थेमध्यें सामान्य मनुष्य आपल्या वासना भगवंतावर लादतो. भगवंतानें त्या तृप्त केल्या तर त्याच्याशीं संबंध राखतो. नाहींतर तो तोडतो. वासना पूर्ण करण्याचा अनेक साधनांपैकीं भगवंत हें एक साधन समजलें जातें. नामाचा अभ्यास चालू केल्यावर हें बरोर नाहीं असें आपोआप कळूं लागतें. तरीपण वासना कांहीं सुटत नाहींत. म्हणून येथें शिकण्याची गोष्ट अशी कीं, भगवंत आपला मालक आहे असें समजून आपल्या वासना तृप्त करण्याची प्रार्थना रोज त्याला करावी. मागायाचें तर भगवंतापाशींच मागावयाचें, तो देईल अगर न देईल, दिलें तर बरेंच झालें पण न दिलें तर त्याच्याच नांवानें रडावें, काहीं केल्या त्याला सोडूं नये अशी वृत्ति शरणागतीचें पहिलें चिन्ह समजावें.

---

—कोणाचेंही अकल्याण आपण चिंतावयाचें नाहीं. त्यांत कोणता फायदा? कोणाचें नुकसान झालें तर त्यांत तुम्हांला आनंद मानण्याचें काय कारण? त्याचप्रमाणे दुसऱ्याचें आपल्यामुळें काडीचेही अहित होऊं नये यासाठीं आपण जपायचें आहे.

# नामदेवांची अमृतवाणी

अनुवादकः— गणेश विष्णु कविटकर, एम्. ए.

## राग सोरठी

**भाई रे भरम गया भौ भागा। तेरा जन कहां का तहां जाइ लागा॥ टेक॥**
**बाजीगर डाक बजाई। सब दुनी तमासै आई।**
**बाजीगर षेल सकेला। तब आपै रहै अकेला॥ १॥**
**रामराई माया लाई। सब दुनिया सौदे आई।**
**सब दुनिया सौदा कीन्हां। काहूं आतमरम न चीन्हां॥ २॥**
**मृग षेत विझूका देषै। भैचकि भैचकि पेषै।**
**त्रिकटि गया सुधि पाई। अडवायैं कहा डराई॥ ३॥**
**यहु सृषन षेत विझूका। गई संक्या मन टूका।**
**नामदेव सतगुर समझावै। याही थैं कहा बतावे॥ ४॥**

**अर्थ :** अरे भाई! भ्रम गेला आणि संसार पळाला. तुझे भक्त मूलस्थानाकडे म्हणजे जेथून आले तिकडे गेले. खेळ करणारानें ढोल वाजविला आणि सर्व लोक खेळ पाहावयास आले. जादूगारानें खेळ थांबविला तेव्हां तो एकटाच राहिला ( सकल जगत् हा एक चिद्विलास आहे आणि प्रवाहरूपानें तो नित्य आहे; पण जेव्हां तो आपल्या मूळ स्वरूपांत विलीन होतो, तेव्हां हा 'मी' आणि हें 'जगत्' असा भेदहि उरत नाहीं. जग म्हणजे जादूचा खेळ आहे आणि तो जेव्हां आवरला जातो तेव्हां परमेश्वरच एकत्वानें उरतो.

रामरायानें माया आणली ( कार्यप्रवण झाली ) आणि सर्व दुनिया बाजाराला आली. सर्व लोकांनीं ( दुनियेनें ) बाजार केले; परंतु आत्मारामाला मात्र कोणी निवडले नाहीं. मृगाला शेतांतले बुजगावणें दिसतें आणि तो भयचकित नजरेनें पाहतो. जवळ जाऊन पाहिलें तर कुठें उरते भीती? ( तर ती भीती व्यर्थ असते ) जेव्हां शेतांतच बुजगावण्याचा पुरा शोध घेतला तेव्हां मनांतल्या शंका नाहींशा होऊन मन आनंदले. नामदेवांना सद्गुरूंनीं समजाऊन दिलें आहे कीं, जे आहे तें येथें आहे. ते दुसरीकडे कुठें दाखवितां येईल?

# नाथमाधवांची राष्ट्रीय कामगिरी

184

लेखकः—पु. बा. कुलकर्णी

**गेल्या जून महिन्यांत स्वराज्यावरील कादंबऱ्यांचे लेखक कै. नाथमाधव यांचें पुण्यस्मरण कित्येक ठिकाणी झालें. १९२८ च्या जूनमध्यें ते निधन पावले, त्या घटनेला आतां चाळीस वर्षें होत आलीं. त्यांच्या पुण्यस्मरणार्थ त्यांच्या राष्ट्रीय कामगिरीची किंचित् ओळख करून देणारा हा लेख.**

महाराष्ट्रांत हरीभाऊ आपटे ह्या श्रेष्ठ कादंबरीकारांचे समकालीन व उत्तम प्रकारचा नावलौकिक मिळविलेले ऐतिहासीक कादंबरीकार म्हणजे नाथमाधम हे होत. त्यांनीं विपूल कादंबरीलेखन केलें; परंतु त्यानीं शिवछत्रपतीवर नि त्यांच्या काळावर ज्या स्वराज्यावरील कादंबऱ्या लिहिल्या, त्यांचें महात्म्य त्या काळाच्या व स्वातंत्र्यप्राप्तीच्या दृष्टीनें फारच मोठें आहे.

त्या विशिष्ट ध्येयानें प्रेरित होऊन लिहिलेल्या कादंबऱ्या होत्या. कोणतें तें ध्येय ? आपण त्याकाळीं पारतंत्र्याच्या खाईंत खितपत पडलेले होतों. चैतन्यहीन बनलेले होतों. सर्वच म्हणजे जीवनांत जें जें महत्त्वाचें नि मोलाचें तें सारें आम्हीं गमावून बसलेले होतों.नव्हता आमच्यात स्वदेशाचा अभिमान,नव्हता स्वभाषेचा नि स्वसंस्कृतीचा वा आपल्या पोषाखाचाही अभिमान. परक्यांचें-इंग्रज राज्यकर्त्यांचें तेवढें सारें श्रेष्ठ व आपलें तेवढें हीन, अशी मनाची प्रवृत्ती बनलेली होती. ती कशामुळें ? दीर्घकाळ पारतंत्र्यांत गेल्यामुळें !

ज्या काळांत शिवछत्रपतींनी स्वराज्याची स्थापना केली तो काळही असाच होता नाहीं का ? त्याकाळीं आमच्यावर मुसलमानांची सत्ता होती. त्या अंमलाखालीं आमचा धर्म, आमची भाषा नि आमचें सर्वस्व धोक्यांत होतें. काळ बदलला, राजसत्ता बदलली, परंतु मानवी जीवन धोक्यांत आणणारीं कारणें मात्र नंतरच्याही राजवटींत जवळ जवळ तींच होतीं.

ती परकीय सत्ता उलथून टाकून तिच्याजागीं स्वातंत्र्याची स्थापना केल्याशिवाय दुसरा तरणोपाय नाहीं, हें शिवबानीं पाहिलें आणि त्यानीं तरवारीच्या

बळावर ती सत्ता नामशेष करून स्वराज्याची स्थापना करण्यासाठीं आपल्या नि आपल्या सहकाऱ्यांच्या जिवाचें रान केलें! त्यानीं शेवटीं आपलें उद्दिष्ट साध्य केलें.

तीनशें वर्षांचा काळ आतां मागें पडलेला असला तरी शिवछत्रपतींची त्या काळांतील कामगिरी खरोखर अविस्मरणीय आहे. आज स्वातंत्र्याच्या काळांत त्यांच्या कामगिरीचा आपण उदो उदो करूं शकतों. त्यांच्या श्रेष्ठ कामगिरीचें परोपरीनें स्मरण नि कौतुक करूं शकतों. कारण आपण स्वातंत्र्याच्या काळांत आज वावरत आहोंत; परंतु मुसलमानांनंतरच्या काळांत आमच्यावर जी इंग्रजांची सत्ता सुरू झाली व ती महाराष्ट्राच्या दृष्टीनें पहातां सुमारें शेंसव्वाशें-दीडशें वर्षें टिकली, त्या काळांत आम्हीं शिवछत्रपतीच्या कामगिरीचें व पराक्रमाचे गोडवे गाऊं शकलों नाहीं. त्या श्रेष्ठ वीरपुरुषाला आपण आजच्याप्रमाणें बहुमानाचें स्थान देऊं शकलों नाहीं. फार कशाला ? त्या काळांत शिवछत्रपतीचे गोडवे गाणें, त्यांचा यथायोग्य उदोउदो करणें, हें पाप समजलें जात होतें. तें अराजकतेचे एक लक्षण समजलें जात होतें.

कां बरें? कारण शिवछत्रपतींनीं तत्कालीन जुलमी व आम्हांला सर्वबाबतींत परावलंबी बनवून ठेवणारी परकीय सत्ता उलथून पाडण्याची पराकाष्ठा केली व आपली लढाऊ शक्ति नि युक्ति यांच्या बळावर त्या सत्तेला नमायला भाग पाडलें.

जनता अशा वीर पुरुषाचें स्मरण करूं लागली, त्याचें गुणगान नि कौतुक करूं लागली तर मोठा हलकल्लोळ माजेल; जनता त्या वीरपुरुषाचें अनुकरण सहाजिकपणें करूं लागेल; जनतेंत बंडखोर वृत्ति निर्माण होईल; जनतेंत वीरश्रीचें नि पराक्रमाचें तसेंच स्वातंत्र्यासाठीं बलिदान देण्याचें वारें खेळू लागेल!

इंग्रज राज्यसत्तेला तें नको होतें. तें त्या सत्तेला आत्मघातकीपणाचें वाटत होतें, आणि त्यामुळें शिवरायाचे पोवाडे मुक्तकंठानें गाण्याची, त्यांच्या शौर्याचें नि पराक्रमाचें गुणगान करण्याची चोरी होती!

अशा त्या पारतंत्र्याच्या काळांत शिवछत्रपतींचे पवाडे मुक्तकंठानें गाणारा वाङ्मयवीर म्हणजे नाथमाधव हाच होय. आणि हा वाङ्मयवीर स्वतः लंगडा होता. कंबरेखालीं त्याच्या शरिराचा सारा भाग लुळा पांगळा झालेला होता.

आणि तरीही स्वतःच्या वाट्याला आलेल्या दुस्थितीची पर्वा न करतां आपल्या बांधवांत वीरश्री नि चैतन्य निर्माण करून व शिवछत्रपतींचे पोवाडे गाऊन जनतेला स्वातंत्र्याभिमुख करण्यासाठीं त्यानीं आपलें रक्त अखेरपर्यंत आटविलें !

शिवछत्रपतींच्या नि मराठेशाहीच्या कारकिर्दीवर नाथमाधवानीं १९२१ ते १९२८ पर्यंतच्या सुमारें सात वर्षांच्या काळांत एकंदर सात कादंबऱ्या लिहिल्या. 'स्वराज्याचा श्रीगणेशा', ते 'स्वराज्यांतील दुफळीपर्यंत' पेशवाईअखेरपर्यंत त्यांना एकंदर सव्वीस कादंबऱ्या लिहून पूर्ण करायच्या होत्या; परंतु १९२८ सालीं ते अकालीं निधन पावल्यामुळें त्यांनी योजलेलें तें कार्य अपूर्ण राहिलें. सात कादंबऱ्यानंतर त्यापुढील प्रत्येक कादंबरीची रूपरेषा व नावही मुक्रर करण्यांत आलें होतें; परंतु ईश्वरी इच्छा तें महत्तम कार्य त्यांच्या हातून तडीस जावें अशी नव्हती. त्याच्या इच्छेपुढें कोणाचें चालणार आहे ?

परंतु बिपरीत परिस्थितींत नि त्याहीपेक्षां बिपरीत काळांत स्वराज्यावरील कादंऱ्याच्या रूपानें नाथमाधवांच्या हातून जी वाङ्मयीन राष्ट्रसेवा घडली आणि तीही त्या पंगू देहाकडून, तिचें महत्व शब्दांनीं वर्णन करतां येण्यासारखें नाहीं.

सरकारच्या डोळ्यांत न येतां व कायद्याची कक्षा न ओलांडतां त्यांना हें कार्य पार पाडावयाचें होतें. शिवरायांचा स्वदेशाभिमान, त्यांचें स्वातंत्र्यप्रेम आणि त्यापायीं त्यानीं कसकशा युक्ति लढविल्या, आपले सहकारी कसे मिळविले, त्यांच्या ठायीं स्वातंत्र्याची दिव्य ज्योत कशी पेटविली, त्यांनी माणसें मिळवून तीं कशीं राखलीं, त्यांची देवाधर्मावर कशी श्रद्धा होती, आपल्या शत्रूशीं नि मित्रांशीं ते कसे वागत असत, वगैरे अनेक गोष्टींचें नि प्रसंगाचें हुबेहुब वर्णन त्यांनी आपल्या शिवछत्रपतीवरील कादंबऱ्यांतून केलें. वाचकांनीं त्यापासून जरूर तो बोध घ्यावा, स्फूर्ति मिळवावी, आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवावी आणि तदनुरूप आचरण करावें,हीच त्या ऐतिहासीक कादंबरीलेखनामागें त्यांची एकमेव इच्छा होती.ती परिणामकारक रीतीनें परिपूर्ण झाल्याचें पहाण्यास ते जगले नाहींत; परंतु त्यांचें उद्दिष्ट नंतरच्या काळांत पूर्ण झालें, एवढें मात्र खरें.

ज्या काळांत नाथमाधवांच्या स्वराज्यावरील कादंबऱ्या प्रकाशांत आल्या व वाचकांनीं मोठ्या आवडीनें वाचल्या त्या काळांत स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं जोरदार लढा चालू होता. [ १९२१ ते १९२८ ]

लोकमान्य टिळकानीं प्रभावी पद्धतीनें सुरू केलेल्या स्वातंत्र्य लढ्याचें निशाण त्यांच्या निधनानंतर, महात्मा गांधीजींनीं आपल्या हातीं घेऊन त्या काळांत लढा मोठ्या युक्ति प्रयुक्तीनें चालविला होता.

जनतेचीं अंतःकरणें सर्व बाजूंनीं पेटवावीं लागतात. अनेकांनीं आपापलें खांदे देऊन त्या यज्ञांत समिधा टाकाव्या लागतात. त्या काळांत अपघातामुळें पंगुत्त्व आलेल्या नाथमाधवानीं आपलें राष्ट्रीम कर्तव्य ओळखलें. आपणही या लढ्यांत भाग घेतला पाहिजे याची त्यांना तीव्रतेनें जाणीव झाली. तरवारीचें कारण नव्हतें. आणि तरवार हातांतून गळून पडलेली व तिची जागा लेखणीनें घेतलेली होती. तेंच शस्त्र समजून त्यांनी तें लेखणीचें शस्त्र तिला चांगली धार काढून ती त्यांनी खंबीरपणें चालविली. शिवरायाच्या स्वदेशभक्तीची व त्यांच्या प्रखर देशभक्तीची त्यानीं आपल्या कादंबऱ्यांच्या रूपानें सर्वांना जाणीव करून दिली.

ही त्यांची कामगिरी साधीसुधी म्हणतां येणार नाहीं. त्या स्वराज्यावरील स्वदेशप्रेमानें भारलेल्या कादंबऱ्यांनीं कोणतें कार्य केलें ? सध्यांचे भारतसरकारचे गृहमंत्री ना. यशवंतराव चव्हाण हे नाथमाधवांच्या तत्कालीन कादंबऱ्यांसंबंधीं काय म्हणतात पहा : ‘ मी स्वातंत्र्याच्या चळवळींत भाग घेऊन जो कांहीं यथाशक्ति त्याग करण्यास तयार झालों, त्याच्या मागें माझी विशिष्ट मनोभूमिका होती. ही भूमिका कोणी तयार केली? ती नाथमाधवांच्या कादंबऱ्यांनीं तयार केली. मला स्वराज्याच्या चळवळींत भाग घेण्याची स्फूर्ति नाथमाधवांच्या स्वराज्यावरील कादंबऱ्यांनी झाली. त्यामुळें त्यांच्या त्या कादंबऱ्यांचें महत्त्व मला भारी वाटतें. त्या दृष्टीनें मी त्यांचा एक ऋणाईत आहें. ’

जें ना. यशवंतराव चव्हाण यानीं स्पष्ट शब्दांत सांगितलें तेंच तत्कालीन कोणीही वाचक सांगू शकेल. गेल्या स्वातंत्र्य प्राप्तीच्या लढ्यांत शरिरानें पंगू परंतु मनानें खंबीर असलेल्या कादंबरीकार नाथमाधवानी कोणत्या प्रकारें भाग घेतला व शिवछत्रपतींच्या नावानें जनतेंत त्यागाची, कर्तव्याची नि स्वतंत्र्यासाठीं स्वतःचें बलिदान देण्याची स्फूर्ति कशी निर्माण केली, हें यावरून दिसून येईल.

# मीठ एक क्षार

**************

189 (लेखकः— द. शं. टिपणीस)

**लोककल्याणासाठीं आपले जीवन बरबाद करून आत्मसमर्पण करणारे जे जे कोणी ते ते सर्व क्षार कुटुंबांतील होत. कारण मिठाप्रमाणेंच त्याच्यामुळें आपल्या जीवनाला स्वाद व ऐहिक कां होईना, वैभव व सुखसमृद्धि प्राप्त झाली आहे.**

साखरेशिवाय किती अडून राहते हा अनुभव गेल्या कांहीं वर्षांत सर्वांनाच आला आहे व साखर अर्धमुक्त झाली तरीही अजून येत आहे. सर्वांत अडून बसले ते चहा कॉफी. पुष्कळांच्या जीवनांत जेवणाची उणीव चहानें भरून निघते. एकवेळ जेवण नसलें तर चालेल पण चहाशिवाय चालणार नाहीं. दुधाची तहान ताकावर या न्यायानें चहाची तल्लफ साखरेऐवजी गुळाच्या चहावर भागवावी लागते. लहान बालकांच्या दृष्टीनें साखर किती महत्वाची आहे हें कोणीही डॉक्टर सांगूं शकेल. साखरेच्या अभावामुळें श्रीखंड बासुंदी जिलबी आदी पक्वान्नांना आज सर्व साधारण माणसाला मुकावें लागतें. जिथें माणसालाच मिळत नाहीं तिथें मुंगीला साखरेचा रवा तरी कोण देणार? साखरेऐवजीं श्रवणाला समान वाटणारे पण साखरेची सर नसलेले असें सॅकरीन सर्रास वापरलें जाते. त्याचे कांहीं दुष्परिणाम होतही असतील. तरी माणसाला नाईलाजानें गुळ सीटेक्स असें कांहींनाकांहीं वापरून साखरेची उणीव भरून काढणें भाग पडते. तल्लफीपुढें माणसाचें कांही चालत नाहीं पण व्यापाऱ्याचें मात्र व्यवस्थित चालतें. साखरेसारख्या अत्यंत अवश्य पदार्थाच्या अभावामुळें आपले एवढे हाल होतात तर मग साखरेपेक्षांही अधिक आवश्यक असलेला पदार्थ मिळेनासा झाला तर किती हाल होतील याची कल्पना करावी. (साखरेची उणीव गुळ सॅकरीन वगैरे कशीबशी तरी भरून काढतील पण या पदा-

र्थाची उणीव दुसऱ्या कशानेही भरून काढतां येणार नाहीं. पण सुदैवानें तो पदार्थ खुल्याबाजारांत माफक दरानें मिळतो व आशा आहे पुढेंही तो मिळत राहील. अजूनपर्यंत तरी तो काळ्याबाजारांत गेला नाहीं. यामुळें तुटक्या रेशनिंगमध्येंही लोकांना थोडे फार चार पदार्थ खाता येतात. असा पदार्थ म्हणजे मीठ—क्षार.

मीठ हें जीवनाचा आधार आहे. मिठाशिवाय जीवन व जीवनाशिवाय मीठ नाहीं. मीठ नसेल तर सगळे काम अळणी. कोणत्याही स्वयंपाकघरांत जा तेथें मीठ हा पदार्थ असावयाचाच. एक निगोड वा बिन साखरेचा चहा मानून घेतां येईल. पण मिठाविना भाजी आंबटी कोण तोंडांत घालील. साखर नसेल तर अडायचें नाहीं पण मीठ नसेल तर उपाशी राहण्याची पाळी येईल. पक्वान्नें झाली तरी त्यांना चव येण्यासाठीं मिठाची जरुरी लागते. साखरेची चव खुलवायला मीठ अल्प प्रमाणांत कां होईना जरूर आहे. मिठामुळें तिखट पदार्थांना चव येते एवढेंच नव्हे तर तें तिखटाचा तिखटपणा नरम करतें, मीठ खारट आहे. खारटाचा माणसाला तिटकारा असतो. जीभेला खारट लागलें कीं आपण थूं थूं करतो पण तेंच प्रमाणांत असलें तर मिटक्या मारतों. स्वयंपाकाप्रमाणें आपल्या साहित्यांतही मिठाचा वापर भरपूर केला जातो हें, नावडतीचें मीठ अळणी, जखमेवर मीठ चोंळणें, दुधांत मिठांचा खडा, मीठभाकर, मीठ तोडणे, तिखट मीठ लावणें वगैरे वाक् प्रचारांवरून दिसून येईल. मीठ हें आपल्या इतके अंगवळणीं पडलें आहे कीं तें आपल्याला येणाऱ्या घामांतही असते. कल्पना करा कीं जगांतील सर्व मीठ एकाएकी नाहींसे झालें तर किती गोंघळ उडेल! मीठ हें क्षारकुटुंबांतील आहे, क्षारकुटुंब नाहीसे झालें तर इकडची दुनिया तिकडे होईल, स्वादिष्ठ व रुचकर पदार्थांच्या अभावामुळें हॉटेल्स व खानावळ्या अळणी वाटून गिऱ्हाईकी बंद होईल व बेकारीमुळें मोर्च्यांना ऊत येईल. घरोघरीं लोक आंबट तोंडें करून बसतील व अळणी उपवास करण्याची त्यांच्यावर पाळी येईल; आणि समजा याचवेळी मिरच्यांच्या महिला मंडळानें क्षारांना सहानुभूति म्हणून संप करून त्या नाहींशा झाल्या तर कहरच उडेल. मीठ मिरची ही भाऊबहिणीची जोडी आहे म्हणून आपण सुखानें घास खातों. रंगादि अनेक कारखाने बंद पडतील व बेकारीची लाट उसळून औद्योगिक क्रांति होईल. डॉक्टर लोकांना बाटल्या व खिसे भरण्याचा (रिकामे करण्याचाही)

उद्योग बंद करावा लागेल व क्षाराभावी रोगी लोकांचे हाल होतील. जमिनींतील नाना क्षारांवर वनस्पतींचें पोषण अवलंबून असतें. क्षारांनी जगाला रामराम ठोकला तर औषधापुरतीही वनस्पती मिळणार नाहीं. मग कसली भाजी फळे नि कंदमुळें ? धान्य तरी कसें उत्पन्न होईल ? जगच खलास होण्याची पाळी येईल. क्षारकुटुंबाच्या अभावीं जगाचा विनाशकाल येऊन ठेपेल इतकें महत्व क्षारांचें आहे.

१७०

मानवी जीवनाला मीठ जसें आवश्यक आहे तसेंच त्याच्या औषधी गुणधर्मांमुळे व्यवहारांतही त्याचा उपयोग होतो. मीठ अँटिसेप्टिक आहे ही गोष्ट मिठाच्या गुळण्या घशाच्या विकारांत करतात यावरून दिसून येते. मिठाचा उपयोग छाती वगैरे शेकण्यासाठी होतो व त्याच्या उष्णतेमुळे कफ पातळ होऊन रोग्यास आराम वाटतो. मीठ उष्णताहारक आहे. तापामध्ये मिठाची घडी ठेवल्यास तापाच्या चढण्याला प्रतिबंध होतो. मीठ कीटकनाशक व प्रतिबंधक आहे. त्याच्या वापरामुळें लोणची व इतर खारावलेले पदार्थ दीर्घकाळ न नासतां टिकून राहतात.

मिठाला सगून ( शकून ) समजतात. बलिप्रतिपदेला मीठ अवश्य खरेदी करावे अशी एक जुनी प्रथा आहे; कारण या दिवशीं घरांत मीठ येणे म्हणजे अन्नपूर्णा येणे आहे व त्यामुळे वर्षभर घरांत अन्नाचा तुटवडा येत नाहीं असें समजतात. मीठ हें निष्ठा उत्पन्न करणारे आहे. रानटी जाती, लुटमार चोऱ्या करणारे दरोडेखोर यांच्यामध्यें अशी एक प्रथा आहे म्हणतात कीं ज्याचें मीठ खाल्ले अन्न खाल्ले त्याच्या जीवाला चुकूनही अपाय करायचा नाहीं एवढेंच नव्हे तर त्याच्या जीवाला जीव द्यायचा हजारों डोस पाजल्यानें जें होणार नाहीं ते मीठाच्या कणानें होते, ही मिठाची करामत कांहीं लहान सहान नाहीं. मिठाच्या मानवी जीवनांतील महत्व ओळखून म. गांधीनी गोरगोरिबांना मीठ सदैव उपलब्ध व्हावें म्हणून मीठ सत्याग्रह केला. त्यामुळें मीठ काळ्याबाजारांत गेलें नाहीं कीं त्याची किंमत भरमसाट वाढली नाहीं त्यावेळीं महात्माजींनीं व्यक्त केलेल्या इच्छेला आजही स्वतंत्र भारतांत भारतसरकारकडून मान दिला जातो. यांत जसा महात्माजींचा गौरव आहे तसा मिठाचाही आहे. दृष्ट लागणें म्हणून एक प्रकार आहे. असा समज आहे. मीठमिरची वगैरेंनी दृष्ट काढल्यास दृष्ट लागल्यापासून होणारे

दुष्परिणाम टळतात असें म्हणतात. दृष्ट लागली असेल तर अशावेळीं मीठमिरची अग्नीत टाकल्यावर घाण सुटते व तशी ती सुटली म्हणजे दुष्परिणाम टळले असे समजतात. एरव्ही मिठाची घाण सुटत नाहीं. कांहीही असो मुद्दा असा कीं ऐहिक जीवनाप्रमाणें मिठाचा थोडा फार संबंध दूरान्वयें का होईना अध्यात्माशी येतो. यामुळें संत हे मिठासारखे म्हणजे मिठाप्रमाणें जीवनाला पोषक आहेत असे म्हणावेंसे वाटते. कारण मिठातील चांगले गुणधर्म त्यांच्या ठिकाणीं आहेत.

मीठ खनिज आहे तसें ते खाऱ्या पाण्यापासूनही तयार होतें. कांहीं जन्मतात ते संत म्हणूनच. उदा. श्री साईबाबा, आद्यशंकराचार्य, ज्ञानेश्वर वगैरे. खाऱ्या पाण्यापासून मीठ तयार होतांना अति ताप सहन करावा लागतो. अत्यंत कडक उन्हांत भाजणाऱ्या चटके देणाऱ्या दाहांत उघड्यावर कांहीं दिवस तपश्चर्या करावी लागते. तेव्हां पाणी आटून त्यांतून मीठ निर्माण होतें. संतहीं असेच निर्माण होतात. 'चणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदीं नाचे' असा कडक उन्हाळा त्यांच्या वाटेस येतो. दाहक परिस्थितीच्या कडक उन्हांत चटके खाऊन खाऊन त्यांचें जीवन अगदीं भाजून निघतें व अहंकाराचें पाणी साफ आटून जातें तेव्हां संत निर्माण होतात. व मानवी जीवनाचें पोषण करतात. ज्याचें मीठ खाल्लें त्यांच्याविषयीं निष्ठा राखली जाते, तसेंच संतांनीं एकदा अनुग्रह दिला कीं त्यांच्याविषयीं निष्ठा वाढीस लागून हळूहळू तिचें रूपांतर ईश्वरनिष्ठेत, भक्तींत होतें व आध्यात्मिक जीवनवेलीला टवटवीत पालवी फुटून कालांतरानें बहरून येते. दाहकता व वेदना कमी करण्याचा गुण मिठांत आहे. संतांत हा गुण मिठापेक्षांही अधिक प्रकर्षानें दिसून येतो. शारीरिकच नव्हे तर मानसिकही सर्व प्रकाराचे ताप हरण करून जीवन शांत व उल्हसित करण्याचें सामर्थ्य संतांच्या ठिकाणीं आहे. जगाला पीडित करणारे त्रिविध ताप हरण करण्याचें सामर्थ्य एक वेळ ईश्वराच्या ठिकाणीं नसेल पण तें संतांच्या ठिकाणीं असतें. रखरखीत उन्हाळ्यांत उकाडा होत असतां आकांशांतील चंद्राकडे पाहिल्यावर किती शांत व उल्हसित वाटतें. त्याचे शीतल किरण अंगावर पडल्यास जीव कसा थंडावतो! संसाराच्या कडक उन्हाळ्यांत अध्यात्माच्या आकाशांत प्रसन्नमुद्रा असलेल्या संतांचें चंद्रमुख पाहिल्यावर व त्यांच्या कृपादृष्टीचे शीतल किरण आपल्या अंगावर पडल्यावर आपलें सर्व जीवन अगदीं शांत उल्हसित व प्रफुल्लित होत असतें. मिठानें दृष्ट काढल्यास बाधा

पळते पण संतांची व आपली नुसती दृष्टादृष्ट झाल्यास बाधा भूत, पिशाच्च वा कांहीं अनुचित असल्यास सूर्योदयाबरोबर अंधकार पळून जावा तसे पळून जातात. लोणच्यांत मीठ मिसळलें कीं तीं टिकाऊ होतात. त्यांत कृमिकीटक होत नाहींत. आपल्या जीवनांत आपण संत मिसळले म्हणजे त्यांचा उपदेश अंगवळणी पाडून घेऊन त्याप्रमाणें वर्तन करीत राहिलों तर आपल्या जीवनांतील नाना विषयांचे विकारांचे कीटक वा कृमि वळवळ करून आपलें जीवन पोखरून टाकतात त्यांचा नाश होऊन नवीन निर्माण होण्यास प्रतिबंध होईल व ऐहिक व आध्यात्मिक व दोन्ही जीवनें समृद्ध होतील व लोणच्याप्रमाणें टिकाऊ व चवदार होतील. मीठ अँटिसेप्टिक आहे तसे संत कामक्रोधाला अँटिसेप्टिक आहेत. त्यांच्या संगतींत राहिल्यानें काम क्रोधादि व्याधि बळावत तर नाहींतच, उलट त्यांचा नाश होतो. संत हे मिठाप्रमाणें शकून आहेत हें ' संत येती घरा तोचि दिवाळी दसरा ' या तुकारामाच्या प्रसिद्ध उक्तीवरून स्पष्ट होतें. संतांचे पाय घराला लागणें हें शुभदायी आहे. घरांतील माणसांच्या वैभवाला व आरोग्याला ते पोषक आहेत. समजा कांहीं चमत्कार घडून मध्यरात्रीं आपल्या घरीं सूर्य आला तर काय होईल ? आपल्या घरीं मध्यरात्र राहील का ? लख्ख चक्क दिवस होईल. तसेच संत. त्यांच्या कृपादृष्टीच्या किरणांनीं सर्व अमंगल नाहींसें होऊन सर्व घर मंगलमय होईल. पाण्याबरोबर पाण्याचा ओलावा असणारच व जेथें पाणी जाईल वा तें ज्याला स्पर्श करील त्याला तो ओलावा लागणारच. तद्वत् संतांबरोबर त्यांची दयार्द्रदृष्टी व आत्मतेज असतें व म्हणून त्यांच्या परिसरांत येणाऱ्या व्यक्तीवर त्यांचा थोडा फार परिणाम हा होणारच. आपल्या कपड्यावर तांबड्या रंगाचा व कुठल्याही रंगाचा झोत पडल्यास कपड्याच्या मूळ रंगांत बदल झालेला दिसतो. हा अनुभव नित्याचा आहे. संतांच्या रोमरोमांतून आत्मतेज बाहेर फांकत असतें ( रंगाच्या झोताप्रमाणें तें दृश्य नाहीं. ) व त्यांच्या परिसरांत येणाऱ्या गोष्टी उजळून निघतात. म्हणूनच मिठाच्या संगतीनें भाजी आमटीला चव येते त्याप्रमाणें संतांच्या संगतीनें आपलें जीवन रुचकर होतें व इतरांना तें हवें हवेंसें वाटतें. संत आहेत म्हणून समाज आहे. मिठाप्रमाणें संत नाहींसे झाले तर जग उजाड होईल. संतांच्या जीवाचें वाळवंट करून

जगाच्या समाजाच्या व मानवजातीच्या कल्याणासाठीं व सुखासाठीं झटणारे वीर पुरुष, थोर विभूती जगांत झाल्या नसल्या तर या विसाव्या शतकांतील मानवाची व त्याच्या वैभवाची वाढ आज आपल्याला दिसली असती काय! लोककल्याणासाठीं आपलें जीवन बरबाद करून आत्मसमर्पण करणारे जे जे कोणी ते सर्व या क्षार (संत) कुटुंबांतीलच होत. कारण मिठाप्रमाणेंच त्यांच्यामुळें आपल्या जीवनाला स्वाद व ऐहिक कां होईना पण वैभव व सुख प्राप्त झालें आहे. संत आपल्या जीवनांतील क्षार आहेत. सुरवातीला खारट जरी वाटले तरी अंतीं त्यांना गोड अमृताची चव येते. यास्तव संतांचा वापर आपल्या जीवनांत वेळोवेळीं केला तर त्यायोगें मानवजातीचे भलें होईल.

---

# बोधपर कथा

— सन्त विनोबा

**सद्भावना**

चौघं मित्र होते. ते एका खोलीत जसेच्यातसे बिछाने पसरून झोपले होते. खोली लहान होती. एकसुद्धा अधिक बिस्तरा घालण्याची तिथं सोय नव्हती.

परंतु बाहेर जोराची हवा वहात होती. नंतर पाणीहि सुरू झालं. बाहेर झोपलेल्या दोन सोबत्यांनीं आत झोपण्याची परवानगी मागितली.

खोलीत झोपलेल्या सोबत्यांनी म्हटलं,

"इथं झोपायला जागा नाही. पण तुम्ही आत या. आपण पाय पोटाशी घेऊन पडून राहू."

दोन तासानंतर आणखी दहाजण आले. त्यांनी म्हटलं,

"आम्हाला आत घ्या."

जे लोक खोलीत झोपले होते त्यांनी म्हटलं,

"आत झोपायला जागा नाही. पण आपण आत या. आपण सारे बसून राहू."

त्यानंतर पुन्हा आठदहा लोक आले आणि पावसात भिजत कुडकुडत म्हणाले,

"आम्हाला आत घ्या." १९२

आतून आवाज आला,

"खोलीत मुळीच जागा नाही. पण आपण आत या. आपण सारे उभे राहू."

या वृत्तीला सर्वोदयाची वृत्ति म्हणतात.

गुजराथचे एक साधुपुरुष रविशंकर महाराज नेहमी म्हणत असतात की आपण गालिचावर बसून असतांना अचानक काही पाहुणे आले तर आपण त्यांना खाली बसवतो काय ?

जे जे आपल्या गावात पैदा झाले त्या सर्वांना गावात जगण्याचा हक्क आहे. गावाची सारी संपत्ति या सर्वांच्या मालकीची आहे. अडचणीत-सुद्धा दुसऱ्याचा विचार करणे ही भूदानाची, सर्वोदयाची भावना आहे. म्हणजे ती एक सद्भावना आहे.

## शेतकरी

एक शेतकरी होता. तो खूप मेहनत करायचा आणि भरपूर पीक घ्यायचा. दिसायला अत्यंत साधा परंतु त्याच्या घरात धान्याच्या कोठ्यावर कोठ्या भरलेल्या असत. जो कोणी त्याच्या घरी येई त्याच्यासाठी ओसरीचा काठ आणि दोन भाकरी हजर असत. त्याचा एक भाऊ सैन्यात सेनापति होता. दुसरा भाऊ सुप्रसिद्ध व्यापारी होता आणि तिसरा भाऊ अत्यंत विद्वान होता. आपापल्या परीनें ते अवघेच सुखी होते.

एकदा सेनापतीची सेना पराजित झाली. तो जीव घेऊन पळत निघाला. आपल्या शेतकरी भावाकडे त्याला आश्रय मिळाला.

एक दिवस असा आला की त्याच्या व्यापारी भावानं दिवाळं काढलं आणि आपल्या शेतकरी भावाचा आधार घेतला.

पुढं एक दिवस विद्वान भावाचं डोकं कामातून गेलं. तो वेडा झाला. त्याचासुद्धा सांभाळ या शेतकऱ्यानंच केला. शेतकरी सर्वांना म्हणायचा,

"या घराचे दरवाजे सर्वांसाठी खुले आहेत. मेहनत करा आणि पोट भरा."

त्या शेतकऱ्याला एक बहिण होती. तीसुद्धा शेतकऱ्यासारखीच सगळ्या कामात तरबेज होती. ती शेतात काम करायची. गुरांचं चारापाणी करायची आणि सर्वांसाठी स्वयंपाक करायची. शेतकरी आणि त्याची बहीण हीं दोघंहि फार मेहनती होतीं. परंतु लोक त्यांना वेड्यात काढत.

शेतकऱ्याच्या बहिणीला एक सवय होती. जो कोणी तिचेकडे येईल त्याचा ती हात पहायची. ज्यांच्या हाताला घट्टे पडलेले दिसत त्यांना पाहून ती आनंदीत होई. त्यांना खोलीत बसवून जेवायला देई. आणि ज्यांचे हात नाजूक, सुकुमार असत त्यांचा ती तिरस्कार करी. त्यांना मग ओसरींत जागा मिळे. ती नेहमी म्हणायची,

"जो श्रम करील त्याला खाण्याचा हक्क आहे."

## बुद्ध आणि त्यांचा शिष्य

भगवान बुद्धांना एक शिष्य होता. त्याचं नांव पूरन. एक दिवस त्यानं बुद्धाला प्रणाम केला आणि सांगितलं,

"महाराज, आता माझा अभ्यास पूर्ण झाला आहे. मी 'सोना' नामक प्रदेशात जाऊन सेवा करू इच्छितो. आपण मला आशीर्वाद द्याल ?"

बुद्धानं म्हटलं,

"त्या प्रदेशाचे लोक तुला शिव्या देतील, अशा वेळी तू काय करशील ?"

शिष्य म्हणाला,

"मी त्यांची सेवा करीन. आणि असं समजेन की मला त्यांनी केवळ शिव्याच दिल्या. मारलं तर नाही ना ?

बुद्धानं पुन्हा विचारलं,

"आणि जर त्यांनी तुला मारलं तर ?"

शिष्य म्हणाला,

"तर मी असं मानेन कीं त्यांनी मला फक्त मारलंच. माझा जीव तर घेतला नाही ना ?"

यावरहि बुद्धानं पुन्हा विचारलंच,

"आणि जर त्यांनी तुला जिवानिशी मारलं तर ?"

पूरन म्हणाला,

"तर मी सांगेन कीं सेवाकार्य करीत असतांना मला मारलं गेलं. काही लोक जीवनाला कंटाळून आत्महत्या करतात. त्याप्रमाणं मी आत्महत्या केली नाही ना ?"

आपल्या शिष्याचं हें विलक्षण धैर्य आणि दुसऱ्यांचे दोष पचविण्याचं सामर्थ्य पाहून भगवान बुद्धांनी त्याला प्रसन्नतापूर्वक 'सोना' प्रदेशांत जाण्याची आज्ञा दिली व आशीर्वादांचा वर्षाव केला.

**गणेश**

त्याचं नांव गणेश. तो शिकलासवरला नव्हता. पण पहिलवान होता. गुरं चारायचा आणि आरामात दिवस काढायचा.

एक दिवस त्यानं कुणाकडून तरी ऐकलं की नोकरी करायची असली तर कोणीतरी श्रीमंत माणसाकडे केली पाहिजे. त्याशिवाय जमत नाही. गणेशाला हा सल्ला मनापासून पसंत पडला.

सायंकाळी तो गावाच्या प्रमुख माणसाकडे गेला आणि म्हणाला,

"नमस्कार."

"आज इकडे कसा ?"

"एका कामासाठी."

"कोणत्या ?"

"नाही, माझं एवढं काम तुम्हाला करावंच लागेल."

"अरे पण सांगशील तेव्हा ना ?"

मग कुठं गणेश म्हणाला,

"दादा, असं ऐकलं कीं नोकरी श्रीमंताच्या घरात केली पाहिजे. त्याशिवाय आपत्ति संपत नाहीत. मला तुम्ही नोकर ठेवून घ्या."

"पण गणेश, माझ्याजवळ तुझ्या लायकीचं काही काम नाही."

शेवटीं गणेशनं खूप आग्रह केला तेव्हा तो प्रमुख म्हणाला,

"माझ्याजवळ तसं काही काम नाही. पण टेकडीवरील शेतात रखवालीला जात राहशील तर मी तुला दोन भाकरी देत राहीन."

गणेश आनंदून गेला. त्यानं होकार दिला.

गणेश प्रामाणिक होता. जें काम अंगावर येईल तें इमानदारीनं व मन लावून करायचं असा त्याचा स्वभाव होता. तो रोज रात्री शेतात जायला लागला. तिथं रात्रभर जागरण करायचा, प्रामाणिकपणानं शेताची राखण करायचा. पाखरंसुद्धा त्याच्या शेतात भिऊन यायची. मग गुरामाणसांची तर गोष्टच सोडा.

गणेशची प्रामाणिक वृत्ति पाहून शेतमालक अत्यंत खूश झाला.

एक दिवस शेतमालकाकडे एक ठाणेदारसाहेब आले. आपला मालक ठाणेदाराला घाबरतो हें त्याच्या लक्षात आलं. ठाणेदाराला खूश ठेवण्यापलीकडे मालकाला काही सुचत नाही हेंही त्याला कळून चुकलं. त्यानं विचार केला की आपल्या मालकापेक्षा ठाणेदार मोठा असला पाहिजे. आपण ठाणेदाराकडे नोकरी करू या.

आणि तो ठाणेदाराचा नोकर झाला. ठाणेदारसुद्धा त्याच्या कामावर आणि इमानदारीवर खूश होते. परंतु एकदिवस ठाणेदाराचं काम तपासण्यासाठी ठाणेदारांचे वरिष्ठ अधिकारी आले. हे अधिकारी आपल्या मालकापेक्षा मोठे आहेत हे गणेशनं तात्काळ ताडलं. त्यानं ठाणेदारांची नोकरी धरली.

अशा प्रकारे गणेशचा हा नेहमीचा धंदा होऊन बसला. आपल्या मालकापेक्षा थोडासा मोठा माणूस पाहिला की त्याच्याकडे हा नोकरीला गेलाच. पण बदलून बदलून किती मालक बदलणार ? शेवटी थकला. आणि त्यानं बदलावा लागणार नाही असा मालक शोधण्याचं ठरवून टाकलं.

पण असा मालक परमेश्वराशिवाय दुसरा कोण असणार ? पण त्याला शोधायचं कुठं आणि कसं ? शेवटी त्याला कुणीतरी सांगितलं की लोकांची म्हणजेच देवाची सेवा. ह्या विचार मनाला पटताच गणेशनं गावातील आजारी–अपंग माणसांची सेवा सुरू केली. कोणी लुळा लंगडा असेल त्याच्या घरी पाणी भरून ठेवायचा. कुणाची घागर विहिरीत पडली असेल तर गणेश काढून द्यायचा. कुठे आग लागली तर सर्वांच्या आधी विझवायला धावायचा. असा माणूस कुणाला आवडणार नाही ? गणेश साऱ्या गावाचा आवडता झाला.

अशा प्रकारे सेवा करता करता गणेशचं म्हातारपण आलं. गावाचे सारे लोक त्याला गणेशकाका म्हणू लागले. एक दिवस त्याचं इथलं अन्नपाणी संपलं आणि गणेशकाकांनी इहलोकाचा निरोप घेतला. परंतु ज्या दिवशी गणेशकाका मरण पावले त्या दिवशी गावभर दुःखाची छाया पडली. सर्वजण म्हणाले,

“ या गावात खरा माणूस एकच होता—गणेशकाका. त्यानं रात्रंदिवस गावाची सेवा केली. ”

असं म्हणतात की पृथ्वी आधाराशिवाय अधांतरी तरंगली आहे. पण तें खरं नाही. गणेशकाकासारखीं माणसं या पृथ्वीचे आधारस्तंभ आहेत. आणि त्यांच्याच आधारावर ती टिकून आहे !

---

—शरिराला आळशी बनवून ठेवायचें, उद्योग करायचा नाहीं, मनांत कोणाबद्दल तरी राग–द्वेष यांना थारा द्यावयाचा व बुद्धीचा उपयोग न करतां अविचारानें वागायचें, हीं सारीं अशुद्धीचीं लक्षणें आहेत. ही अशुद्धि साफ नाहींशी करून शुद्ध, निर्मळपणें जगांत वावरणें हें प्रत्येक मनुष्याचें पवित्र कर्तव्य आहे.

# शिरडी-वृत्त

## — मे १९६८ —

शिरडीला (मे) महिन्यात बाहेरगांवच्या भक्तांची गर्दी बरीच झाली होती. इतकें लिहिण्यानें खरी कल्पना येणार नाहीं. कारण भक्तांना अलीकडे शिरडी व श्रीसाईबाबा याविषयी बरीच चिकित्सा व कुतूहल वाढलेली आहेत. याचे कारण श्री साईनाथाच्या समाधीचा ५० वा पुण्यतिथीदिन यावर्षी आश्वीन शु. १० ला येत आहे. व तो सुवर्णमहोत्सव या नावांनें फार मोठ्या प्रमाणात सादर होणार आहे, यात शंका नाहीं. श्रीसाईबाबामहाराज हे महान् संत विभूती होऊन गेले, ते हयात असताना पैशाचा संग्रह केला नाहीं, आलेला पैसा सर्वच्या सर्व ते वाटून देत. व जगात आपली प्रसिद्धी व्हावी असा प्रयत्नही त्यांनी कधी केला नाहीं. शिरडीस सर्व प्रांतातून अनेक भाषेचे लोक येतात व पूजाअर्चा करितात. पुणें, मुम्बई, मद्रास, आंध्र, म्हैसूर, सुरत, अहमदाबाद, नागपूर, इंदौर, बडोदा, जबलपूर, बेंगळूर, दिल्ली, अशा प्रांतातून व मोठ्या शहरातून कोठे साईबाबाच्या मूर्ती, फोटो, देवळे बांधून नित्य शिरडीप्रमाणें आरत्या, उपासना व उत्सव मोठ्या प्रमाणात चालू आहेत. व परदेशांत इंग्लंड अमेरिका सिलोन चीन अशा ठिकाणीही श्रीसाईबाबांची देवळें झालेली आहेत म्हणून शिरडीस गर्दी होणे साहजिक आहे.

कांहीं कलाकारांनी श्रींचे समाधीपुढें हजेरी दिली

**कीर्तन—**

श्री. खांडेकर पुणें, श्रीमती गंगामाई नाशिककर पंचवटी (नाशिक) श्री. श्रीपाद बाळकृष्ण देव वकील ठाणें. संस्थान गवई ह्यांची कीर्तनें नेहमीप्रमाणें झाली.

**गायन**

कुमारी सिंधू सदाशिव देशमुख मु. नवसारी (गुजराथ) श्री. कृष्णराव वऱ्हाडकर मुम्बई

**भजनें**

श्री. साईनाथ भजनी मंडळ दिल्ली, गोविंदबाबा तनपुरे भजनी मंडळ पुणें, व्ही. नटराजन् अय्यर, त्रिचनापल्ली भजन मंडळ मद्रास, मद्रास भजनी मंडळ, मिसेस ए. सी. कृष्णा मद्रास.

**नृत्य**

प्रसिद्धनृत्यकार गोपीकृष्ण मुम्बई,

शिरडी येथील हवापाणी चांगलें आहे.

## श्रीमती शांताबाई सुं. नवलकर

साईभक्त श्रीमती शांताबाई सुंदरराव दी. नवलकर ह्या सोमवार दि. १७ मे १९६८ रोजीं सकाळीं ६–१५ वाजता साई-प्रार्थना करीत असतांना हात जोडलेल्या व नतमस्तक असलेल्या स्थितीत आजाराशिवाय शांतपणें वयाच्या ७९ व्या वर्षी साईचरणी विलीन झाल्या. त्या श्रीसाईसंस्थानचे माजी चिटणीस, माजी खजीनदार व साईलीलेचे माजी संपादक कै. सुंदरराव दीनानाथ नवलकर ह्यांच्या सहधर्मचारिणी असल्यामुळे त्यांस श्रीसाईंची १९१० ते १९१८ पर्यंत प्रत्यक्ष सेवा घडली होती. श्रीसाईबाबा त्यांच्या हस्तें जेव्हां जेव्हां शिरडीत असतांना भाकर पोळीच्या भिक्षेकरता पांच घरांपैकी एक घर म्हणून अनेक वेळां आवडीनें भिक्षा स्वीकारीत होते. त्या अत्यंत प्रेमळ साईभक्त होत्या. घरांत व शिरडीस आरतीच्या प्रसंगीं डोळ्यांत प्रेमाश्रू उभे राहत असत. दररोज आरतीच्या वेळीं म्हणण्यास त्यांनी प्रार्थना पद स्वतः रचले होतें. अशा भक्तास श्री साईंनी उत्तम तऱ्हेनें मरण देऊन सद्गतीस पोहचविले.

# श्री साईनाथ हॉस्पिटल

## देणग्यांची साभार पोच

रोखीनें देणग्या देणाऱ्या भक्तांचीं नावें आभारपूर्वक जाहीर करण्यात येत आहेत. ही देणगीदारांची यादी ता. १-१०-१९६७ ते ता. १५-५-६८ पर्यंतची आहे.

| भक्तांचीं नांवें | गांव. | रुपये | पै. |
|---|---|---|---|
| १. श्री. मेजर एम. व्ही. नातू | पुणे ४ | १० | ०० |
| २. ,, एम्. एस्. हळवे | सांगली | ५ | ०० |
| ३. ,, व्ही. बी. देशमुख | कऱ्हाड | ५ | ०० |
| ४. मिस्. जे. डी. मेहता | मुंबई ८ | १०० | ०० |
| ५. ,, आर. सी. जैन | न्यू दिल्ली | २१ | ०० |
| ६. श्री. ए. ए. पारिख | गंझीयाबाद | ३ | २५ |
| ७. ,, जे. एस. वाघ | मुंबई ,, | ५० | ०० |
| ८. ,, बी. एम्. लाल | सिलोसगोन | ६० | ०० |
| ९. ,, एम्. बाल | पुणे | १० | ०० |
| १०. ,, जी. एन्. इनामदार | वेळगाव | १० | ०० |
| ११. ,, ए. बी. पाटील | कोल्हापूर | ७ | ०० |
| १२. ,, एल. एन. बाळसाखरे | मुम्बई २६ | ५ | ०० |
| १३. ,, एच्. एम्. हळवे | पुणे | ५ | ०० |
| १४. डॉ. आर. एम्. खांडेकर | मुर्तिजापूर | ५ | ०० |
| १५. ,, ए. व्ही. कात्ती | हैद्राबाद | ५ | ०० |
| १६. ,, जी. एन्. पत्की | पाटणा | ५ | ०० |
| १७. ,, पानशार | इन्दौर | ५ | ०० |
| १८. मिसेस शांतादेवी | बेंगलोर | २० | ०० |
| १९. श्री. मेजर एम्. व्ही. नातू | पुणे ४ | १० | ०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०. | श्री. पी. पी. नातू | पुणे ४ | १० | ,, |
| २१. | ,, एल. जी. देशपांडे | जबलपुर | २० | ,, |
| २२. | ,, एच. एम्. हळवे | पुणे ९ | ५ | ,, |
| २३. | ,, बी. आर. वर्मा | रायपूर | १० | ,, |
| २४. | ,, मेजर व्ही. पी. नातू | पुणे ४ | १० | ,, |
| २५. | डॉ. एन. पी. सहेता | मुंबई | १०२ | ,, |
| २६. | श्री. रामचंद्र C/o; एम्. बी. गावडे | इन्दौर | ६ | ,, |
| २७. | ,, एच. एस. हळवे | पुणे | ५ | ,, |
| २८. | ,, डी. के. कालेकर | मुम्बई | ४ | ,, |

वरील मुदतींत साईनाथ हॉस्पिटल, निधीसाठीं भक्तांकडून मनिऑर्डरीनें आलेल्या देणग्यांची साभार पोच.

| अ. नं. | भक्तांचीं नांवें | गांव | रुपये | पै. |
|---|---|---|---|---|
| | | मा.पा. बेरीज | ५१३ | २५ |
| २९. | श्री. एच. के. शर्मा | न्यू. दिल्ली | ५ | ,, |
| ३०. | ,, एम्. बी. कामत | मुम्बई | २४० | ,, |
| ३१. | ,, के. आनंदराव | धारवाड | ५ | ,, |
| ३२. | ,, एम्. जामकरीया | इन्दौर | २० | ,, |
| ३३. | ,, एच. एस. टळवे | पुणे | ५ | ,, |
| ३४. | ,, व्ही. के. भट | मुम्बई | २५ | ,, |
| ३५. | ,, मेजर व्ही. पी. नातू | पुणे | ५ | ,, |
| ३६. | ,, एम्. व्ही. नातू | ,, | १० | ,, |
| ३७. | ,, व्ही. पी. नातू | ,, | ५ | ,, |
| ३८. | ,, आर. एस. खांडेकर | अकोला [ मुर्तिजापूर ] | १२ | ,, |
| ३९. | ,, रामचंद्र C/o; एम्. बी. गावडे | इन्दौर | ६ | ,, |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४०. श्री | एस. जनकराज प्रा. लि. | इन्दौर | २० | „ |
| ४१. „ | एच. एस. हळवे | पुणे | ५ | „ |
| ४२. | मिसेस गीता रामचंद्रन् | बडोदा | २० | „ |
| ४३. „ | मेजर व्ही. पी. नातू | पुणे | १० | „ |
| ४४. „ | बी. व्ही. पीलाय | केरळ | ५ | „ |
| ४५. „ | व्ही. एन्. गादेवार | यवतमाळ | ४ | „ |
| ४६. „ | आर. पी. खारकर | मुम्बई | ५ | „ |
| ४७. „ | बी. आर. वर्मा | रायपुर | १० | „ |
| ४८. „ | एच. के. शर्मा | न्यू. दिल्ली | ५ | „ |
| ४९. „ | डी. एन्. दस्तूर | सिकंदराबाद | १० | „ |
| ५०. | डॉ. के. सरोजनी देवी | गुन्तूर | २० | „ |
| ५१. „ | झेड. पी. जोशी | अहेरी | ११ | „ |
| ५२. „ | आर. जनकराज प्रा. लि. | इन्दौर | २० | „ |
| ५३. „ | इ. व्ही. भास्कर | मुम्बई | १० | „ |
| ५४. „ | रामचंद्र एम्. बी. गावडे | पुणे | ६ | „ |
| ५५. „ | बे. ए. दावू | अमरावती | ५१ | „ |
| ५६. श्री. | डी. के. कालेकर | मुम्बई | ५ | „ |
| ५७. „ | व्ही. एन्. गादेवार | यवतमाल | १० | „ |
| ५८. „ | मेजर व्ही. पी. नातू | पुणे | १० | „ |
| ५९. „ | एम्. व्ही. नातू | „ | १० | „ |
| ६०. „ | बी. डी. कालेकर | मुम्बई २९ | ५ | „ |
| ६१. „ | रामचंद्र C/o; एम्. बी. गावडे | इन्दौर | ६ | „ |
| ६२. „ | एस. जनकराज प्रा. लि. | इन्दौर | २० | „ |
| | | एकूणः—रुपये | १२२९ | ५० |

# हॉस्पिटल फंडासाठी रोख देणग्या

| अ. नं. | भक्तांचीं नांवें | गांव | रु. | पै. |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. बी. अेन्. पटेल | मुंबई | ११ | — |
| २ | अशोक आणि राजलक्ष्मी | ,, | १०१ | — |
| ३ | श्री, आर. के. दीवाण | पुणे | १० | — |
| ४ | ,, सी. बी. पटेल | मुंबई | २०० | — |
| ५ | ,, सी. पी. पटेल | ,, | ५१ | — |
| ६ | सौ. आर. अेस. संघवी | ,, | ११ | — |
| ७ | श्री. ईश्वरलाल लल्लुभाई पटेल | | १०० | — |
| ८ | टी. एच्. प्रधान व कंपनी | मुंबई | २१ | — |
| ९ | सौ. सी. वाय. लवंदे | ,, | २०० | — |
| १० | श्री. अेम. अेस. मयेकर | ,, | ४१ | — |
| ११ | ,, अेस. जी. रणदिवे | ,, | २५ | — |
| १२ | स्वर्गीय श्रीमती सरस्वतीबाई बावडेकर | ,, | १०१ | — |
| १३ | श्री. जोशी केशराम | ,, | ११ | — |
| १४ | ,, अेस. सी. देसाई | ,, | ५० | — |
| १५ | श्रीमती अे. उपाध्याय | उज्जेन | १०१ | — |
| १६ | ,, उषा तिवारी | रायपूर | ११ | — |
| १७ | श्री. चंदराम | मुंबई | २५ | — |
| १८ | ,, सी. पी. पटेल | ,, | ५१ | — |
| १९ | श्री. ललितचंद्र सी. देसाई | ,, | २५० | — |
| २० | ,, व सौ. अे. अेन्. पटेल | अहमदाबाद | १०१ | — |
| २१ | ,, जी. आळशावाला | मुंबई | ११ | — |
| २२ | ,, अेस. पी. वधवा | घाटकोपर | ५१ | — |
| २३ | ,, वाय. व्ही. श्रॉफ | मुंबई | ५० | — |
| २४ | ,, जी. अेस. करंडे | ,, | ५१ | — |
| २५ | ,, जी. अेन. धारकर | ,, | ५ | — |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ | श्री. पी. अेम. देशमुख | कुलाबा | ५१ | - |
| २७ | ,, अेस. के. नानावटी | मुंबई | ५१ | - |
| २८ | ,, श्रीवस्तवन | ,, | ५ | २५ |
| २९ | ,, के. सावजी | ,, | ५ | २५ |
| ३० | श्रीमती भानुबेन | ,, | ५ | २५ |
| ३१ | श्री. जे. अेच. बजाज | ,, | २११ | - |
| ३२ | ,, मुरलीधर ठाकोरभाई | ,, | १०१ | - |
| ३३ | | ,, | १०१ | - |
| ३४ | संजय पुरुषोत्तमदास | ,, | ११ | - |
| ३५ | अमर के. | ,, | २५ | - |
| ३६ | मुक्ताबेन अेस. | ,, | ११ | २५ |
| ३७ | श्री. अे. सी. भातीजा | ,, | ११ | २५ |
| ३८ | ,, के. के. कुमार | देवळाली | ५ | २५ |
| ३९ | ,, के. सी. भातीजा | मुंबई | ५ | २५ |
| ४० | सौ. आशा | ,, | ५ | २५ |
| ४१ | सी. पी. मेहता | पुणे | ११ | - |
| ४२ | श्री. अेम. भट्ट | मुंबई | २५ | - |
| ४३ | ,, ,, | ,, | १० | - |
| ४४ | जी. आर. भट्ट | ,, | ५ | - |
| ४५ | श्री. धीरजलाल एम. शहा | ,, | ३५१ | - |
| ४६ | सौ. कृष्णाबाई वाझकर | मुम्बई | १० | - |
| ४७ | सीताबाई रामचंद्र सामंत | ,, | १०१ | - |
| ४८ | डॉ. मिस् दुर्गा. जी. दाभोळकर | ,, | १ | २५ |
| ४९ | सेठ. एल. जमनादास | ,, | १२५ | - |
| ५० | श्री. पी. एस. जोशी | ,, | ५१ | - |
| ५१ | ,, जयंतीलाल कोठारी | जळगांव | २५ | - |
| ५२ | भानुमती एन्. मेहता | मुम्बई | २५ | - |
| ५३ | श्री. एन. व्ही. व्यास | ,, | ५ | - |

[पुढील देणग्या पुढच्या अंकांत]

**Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi**

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेलीं पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ( १ ) | **श्रीसाईसच्चरित्र** | ( मराठी ) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| ( २ ) | ,, | ( हिंदी ) | श्री. ठाकुर | ४-५० |
| ( ३ ) | ,, | ( गुजराथी ) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| ( ४ ) | ,, | ( इंग्रजी ) | Shri Gunaji | ४-०० |
| ( ५ ) | ,, | ( Kannad ) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| ( ६ ) | **Glimpes of Indian Spirituality-by Pradhan** | | | १-०० |
| ( ७ ) | **Glimpes of Indian Spirituality** | ( Telgu ) | | १-०० |
| ( ८ ) | **श्री साईलीलामृत** | ( मराठी ) | श्री. आबास्करकृत | २-०० |
| ( ९ ) | **साईबाबा-अवतार व कार्य** | ( मराठी ) | श्री. धोंड | २-०० |
| ( १० ) | **साईबाबांचे ४ अध्याय** | ( मराठी ) | श्री. दासगणू | ००-५० |
| ( ११ ) | **सगुणोपासना** | ( मराठी ) | श्री. भीष्म | ००-२५ |
| ( १२ ) | ,, | ( गुजराथी लिपींत ) | श्री. भीष्म | ००-२५ |
| ( १३ ) | **श्री रुद्राध्याय ११ वा** | ( मराठी ) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| ( १४ ) | **कीर्तन पंचक** | ( मराठी ) | श्री. देव | १-५० |
| ( १५ ) | **शीलधी** | ( मराठी ) | डॉ. [illegible] | ००-३५ |
| ( १६ ) | **श्री साईगीतांजलि** | ( मराठी ) | कवि [illegible] | ००-१२ |
| ( १७ ) | **Guide to Shirdi** | ( English ) | | ००-१२ |
| ( १८ ) | **स्तवनमंजिरी व सुमनांजली** | ( मराठी ) | | ००-२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

**Colour pictures of Sai Baba by Neroy**

| | | |
|---|---|---|
| ( 1 ) | Baba sitting on Stone 9½" × 13½" medium | 00-37 |
| ( 2 ) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* ( मागवा ) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi., Dst. Ahmednagar.
2. **Sai Baba Office 'Sai Niketan,'**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.



मुद्रक: **पांडुरंग दाजीबा मोरे** निर्णयसागर प्रेस, २६।२८ डॉ. एम्. बी. वेलकर स्ट्रीट, मुंबई २

संपादक व प्रकाशक : **द. दि. पाटणकर,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड,